७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## राज ठाकरेंचे सरसंघचालकांना खडेबोल

मुंबई (दै. संध्या) : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावरून पुन्हा एकदा सरसंघचालक मोहन भागवत व संघाच्या नेत्यांना खडेबोल सुनावलेत. काही हजार किलोमीटर अंतरावरून येणारे परदेशी पाहुणे इथे महाराष्ट्रात आल्यानंतर मराठी भाषा सहज मान्य करतात. ते मराठी शिकण्याचा प्रयत्न करतात. पण तिचा अनादर कधीच करत नाही. हे परक्यांना कळतं, पण काही स्वकीयांना कळत नाही. मुंबईत एका कार्यक्रमाला येऊन गेलेल्या सरसंघचालकांना मुंबईत येऊन मराठीत बोलावे असे त्यांना का वाटले नाही? हे माहिती नाही, असे ते म्हणालेत. राज यांनी या प्रकरणी मराठी शिकणाऱ्या एका जपानी तरुणीचा व्हिडिओही पोस्ट केला आहे. गत काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आलेल्या एका जपानी तरुणीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. या व्हिडिओत ही तरुणी मराठी भाषेतील काही वाक्य उच्चारताना दिसत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या तरुणीचा व्हिडिओ पोस्ट करत मराठीचा कथित द्वेष करणाऱ्यांना खडेबोल सुनावले आहेत.

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### गारपीटग्रस्त शेतकरी संकटात

मुंबई (दै. संध्या) : काँग्रेस विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीची मदत करण्याच्या मुद्यावरून सरकारला चांगलेच कोंडीत पकडले. त्यांनी या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी करत धान उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप बोनस मिळाला नसल्याकडेही सरकारचे लक्ष वेधले. त्यांच्या मदतीला भाजप आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवारही धावून आले. विदर्भ आणि मराठवाड्यातील नुकसानीचा पाढा वाचताना वडेट्टीवार म्हणाले की नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील बीड, लातूर, नांदेड, परभणी भागात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीने ज्वारी, गहू, हरभरा ही काढणीला आलेली पिके मातीमोल झाली आहेत. आंबा आणि द्राक्ष बागायतदारांचेही अतोनात नुकसान झाले आहे. हवामान खात्याने सोलापूर, परभणी, नांदेड, धाराशीव भागात पुढील दोन दिवस पावसाचा इशारा दिला असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मागील अतिवृष्टीची मदत अजून मिळालेली नाही, धानाला बोनस जाहीर करून देण्यात आलेला नाही आणि आता पुन्हा संकट आले आहे. सरकारने नियम-निकष बाजूला ठेवून तातडीने रोख मदत द्यावी आणि पंचनाम्यांचे केवळ आदेश न देता प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

### फेब्रुवारीपर्यंत विलंब शुल्कासह मुदतवाढ

पुणे (दै. संध्या) : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) घेण्यात येणाऱ्या 'एमएचटी सीईटी' (पीसीएम/पीसीबी) परीक्षेसाठी विलंब शुल्कासह २५ ते २७ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी अर्ज करण्यासाठी अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. सीईटी कक्षाने 'एमएचटी सीईटी' परीक्षेसह अन्य प्रवेश परीक्षांसाठी नोंदणी अर्ज करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. सीईटी कक्षाने 'एमएचटी सीईटी'सह बी.एस्सी नर्सिंग, डीपीएन/पीएचएन (वैद्यकीय) अभ्यासक्रमाच्या सीईटी प्रवेश नोंदणीसाठी २४ फेब्रुवारी ते १६ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. बी. डिझाईन या अभ्यासक्रमाच्या सीईटीच्या प्रवेश नोंदणीची २५ ते २७ फेब्रुवारीपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. तर बी.एड, एम.एड आणि एमपी.एड या अभ्यासक्रमाच्या सीईटीच्या प्रवेश नोंदणीसाठी देखील २५ ते २७ फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे.

# शासकीय कामकाजात 'एआय'च्या प्रभावी वापरावर भर : मुख्यमंत्री

मुंबई (दै. संध्या)



कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बाजारपेठेचे आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून शासनाने सज्ज आणि सक्षम प्रशासन उभारण्यासाठी शासकीय कामकाजात 'एआय'च्या प्रभावी वापरावर भर देण्यास सुरुवात केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लिडरशिप फोरम 2026 च्या चर्चासत्रात पत्रकार विष्णु सोम यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्रात मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या अध्यक्ष सिंधू गंगाधरन आणि पीडब्ल्यूसीचे अध्यक्ष संजीव कृष्णन यांचाही सहभाग होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासन यंत्रणेत एआयचा वापर वाढवून सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय वाढवून एआय-सक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर शासन काम करत आहे. यासाठी मुंबईत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींचे स्वरूप बदलत आहे आणि शिक्षण प्रणालीने त्यानुसार करावयाचे बदल यावर विचारमंथन होईल. शासन, शिक्षण संस्था आणि नॅसकॉमसारख्या उद्योग संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास 'एआय' क्षेत्रात महाराष्ट्र अधिक वेगाने पुढे जाऊ शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ब्राझीलच्या मंत्र्यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या (DPI) अनुभवाच्या आधारे स्वतःची प्रणाली विकसित करत असल्याचे सांगितले. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारत सध्या जागतिक नेतृत्व करत आहे. राज्यात नुकत्याच सुरू झालेल्या 'एआय' 4ॲग्री समिट'चा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'ॲग्रीस्टॅक' या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याची जमीनधारणा, पिकांची माहिती आणि इतर तपशील एकत्रित केले जात आहेत. त्याचबरोबर 'महाविस्तार' या एआय ॲपद्वारे जनरेटिव्ह एआयचा वापर करून प्रत्येक नोंदणीकृत शेतकऱ्याला वैयक्तिक डिजिटल सहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या 30 लाख शेतकरी या प्लॅटफॉर्मवर जोडले गेले आहेत. 'अँग्रीस्टॅक' आणि 'महाविस्तार' यांचा संगम शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्च 25 ते 40 टक्क्यांनी कमी करण्यास आणि शेतीतील अनिश्चितता कमी करण्यास नक्की मदत करेल. राज्यातील धोरणनिर्मिती आता 'पॉलिसी-लेड ग्रोथ' या मंत्रावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. जागतिक क्षमता केंद्र (जीसीसी) धोरण तयार करताना विविध उद्योग संघटनांचा सहभाग घेतला गेला. त्यानुसार पुणे शहर हे जीसीसी या परिसंस्थेत देशात अव्वल ठरल्याचे अहवालात नमूद झाले आहे. तसेच लॉजिस्टिक धोरणही लॉजिस्टिक कौन्सिलच्या सहभागातून तयार करण्यात आले असून ते भविष्योन्मुख असल्याचे त्यांनी सांगितले. पुरवठा साखळी व्यवस्थापनात लॉजिस्टिक्सची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असल्याने या क्षेत्रात एआयचा वापर वाढवण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. यासाठी नॅसकॉम, सीआयआय आणि विविध सेक्टर कौन्सिल्ससोबत सहकार्य केले जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### 'एआय' म्हणजे संधी

'एआय'मुळे रोजगार नष्ट होतील, या भीतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संगणक क्रांतीच्या वेळीही अशीच भीती व्यक्त करण्यात आली होती. मात्र भारताने त्या क्रांतीचा लाभ घेत आयटी क्षेत्रात मोठी झेप घेतली. आता 'एआय'कडे पर्याय म्हणून नव्हे तर प्रगतीची संधी म्हणून पाहिले पाहिजे. रोजगाराचे स्वरूप बदलेल, नव्या संधी निर्माण होतील. आज 'क्रिएटर' हा व्यवसाय अस्तित्वात आला आहे; तो दहा वर्षांपूर्वी कल्पनेतही नव्हता, असे ते म्हणाले. त्याचबरोबर, नव्या पिढीने तंत्रज्ञान आत्मसात केले असून बदल स्वीकारण्याची मानसिकता महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## मंत्र्यांनी अभ्यास करून यावे

### मुनगंटीवारांनी उडवली मंत्र्यांची भंबेरी

मुंबई (दै. संध्या)



भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवर यांनी आज विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांना अक्षरशः फैलावर घेतले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो, असे सांगून चालत नाही, असे ते या प्रकरणी मंत्री कदम यांचे कान टोचत म्हणाले. राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या मुद्यावर लक्षवेधी मांडण्यात आली. या प्रकरणी विरोधकांनी सरकारला धारेवर धरल्यानंतर त्यांना सत्ताधारी आमदारांचीही साथ मिळाली. यात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला अक्षरशः सळो की पळो करून सोडले. त्यांनी लक्षवेधीला थातूर मातूर उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा मंत्री योगेश कदम यांना चांगलेच खडेबोल सुनावले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो असे बोलून चालत नाही, असे ते म्हणाले.

## लाडकी बहीण योजनेतून अनेक महिलांची नावे वगळली

### भ्रष्टाचारामुळे राज्याच्या तिजोरीवर भार, आदित्य ठाकरेंचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई (दै. संध्या)



राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू असून पहिल्याच दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणानंतर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शोकप्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सगळेच नेते भावनिक झाल्याचे पाहायला मिळाले. मंगळवारी विधानसभेत आणि विधानपरिषदेत वातावरण चांगलेच तापलेले पाहायला मिळाले. यावेळी विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. लाडकी बहीण योजनेतून अनेक महिलांची नावे वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील मुंबईतील वाढत्या प्रदूषणावरून सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, पालिकेला अजून जाग आलेली नाही. शहरातील हवा गंभीर पातळीवर पोहोचली आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केवळ छापील उत्तर देऊ नये, तर प्रत्यक्ष परिस्थिती जाणून बोलावे. कधीतरी खिडकी उघडून बाहेरची स्थिती पहावी, असा टोला ठाकरे यांनी लगावला. पुढे बोलताना आदित्य ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेवरून सरकारवर टीका केली. ते म्हणाले, मराठा आरक्षण आणि कर्जमाफीच्या निवडणूकपूर्व घोषणा अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. लाडकी बहीण योजनेतून अनेक महिलांची नावे वगळण्यात आल्याचा दावा करत, भ्रष्टाचारामुळे राज्याच्या तिजोरीवर भार पडत असल्याची टीका ठाकरे यांनी केली. तसेच राज्याच्या इतिहासात प्रथमच विधानसभेत आणि विधानपरिषदेत विरोधी पक्षनेता नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, भाजप नेमके कुणाला घाबरत आहे? असा सवालही त्यांनी केला. आदित्य ठाकरे यांनी यावेळी अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांवरही चिंता व्यक्त केली. सरकारने याची गंभीर दखल घेतली आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, पुण्यात कॉंग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांना झालेल्या मारहाणीच्या घटनेचा उल्लेख करत गृहखात्याच्या कार्यक्षमतेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## अजित पवारांच्या विमानाचे ३००० तासांचे रेकॉर्डच नाही

मुंबई (दै. संध्या)

- रोहित पवार यांचा दावा; 'VSR' कंपनीच्या रेकॉर्डमध्ये हेराफेरी असल्याचा आरोप



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर आता या प्रकरणाला नवे वळण लागले आहे. "अजित दादांचा अपघात हा अपघात नसून घातपात आहे," असा खळबळजनक दावा त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी केला असून, या तपासातील 'व्हीसीआर' (VSR) कंपनीच्या रेकॉर्डबाबत त्यांनी अत्यंत धक्कादायक माहिती समोर आणली आहे. विमानाच्या रेकॉर्डमध्ये मोठी बनवाबनवी सुरू असून यंत्रणांची एकमेकांशी मिलीभगत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ विमान अपघातात निधन झाले होते. या दुर्घटनेत अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला होता. या अपघात प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी चौकशीची मागणी लावून धरली आहे. आता याच चौकशीच्या प्रक्रियेवर त्यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अजित दादांच्या अपघातातील विमानाच्या चौकशीच्या निमित्ताने रोहित सिंगला काल पायलट म्हणून चौकशीसाठी बोलवण्यात आल्याची माहिती मिळत असून काल रोहित सिंग देशात आला होता. तसेच VSR कडे विमानाच्या ५००० तासांपैकी केवळ १८०० ते २००० तासांचा रेकॉर्ड उपलब्ध असून उर्वरित ३००० तासांचे रेकॉर्डस उपलब्धच नसल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या मिसिंग रेकॉर्डची हेराफेरी, बनवाबनवी VSR ला करता यावी यासाठी चौकशी जाणूनबुजून लांबवली जात आहे का? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्राचा लोकनेता गेला असताना अपघाताला जबाबदार कंपनीच्या मालकाला केवळ पायलट म्हणून चौकशीसाठी बोलावले जात असेल तर याचा अर्थ काय घ्यायचा? दादांच्या अपघाताच्या गुन्हेगारी अँगलची चौकशी CID करत असताना VSR चा मालक भारतात आला असेल तर DGCA ने CID ला कळवणे आवश्यक का समजले नाही? अशी विचारणाही रोहित पवार यांनी केली.

## पवारांची तिसरी पिढी राज्यसभेत जाणार

### राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवारांना संधी

मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्रातील राज्यसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आपला 'पत्ता' खोलला आहे. सोमवारी रात्री पार पडलेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांना राज्यसभेच्या रिंगणात उतरवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, पक्षाची सर्व धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवत त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यावरही शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीची खलबते पार पडली. या बैठकीला सुनेत्रा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. मागील लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पार्थ पवार सक्रिय राजकारणापासून काहीसे दूर होते. मात्र, आता त्यांना थेट दिल्लीच्या वरिष्ठ सभागृहात (राज्यसभा) पाठवून पक्षाने तरुण नेतृत्वाला संधी देण्याचे निश्चित केले आहे. येत्या २६ फेब्रुवारीला वरळी डोम येथे होणाऱ्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांची अधिकृतपणे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घोषणा केली जाईल.

# जनतेच्या तक्रारींची दखल घ्या; फूड जॉईंट्सची प्रत्यक्ष नोंद दाखवा : डॉ. गोऱ्हे

### "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या भव्य पुतळ्याची उभारणी व समृद्धी महामार्गावरील सुविधांबाबत आठ दिवसांत सभागृहाला अवगत करावे ; उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना

### "कागदोपत्री माहितीपेक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणी महत्त्वाची"

मुंबई (दै. संध्या)

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने रस्ता उभारण्यात आलेल्या ठिकाणी त्यांचा भव्य पुतळा उभारण्याची घोषणा होऊनही तीन वर्षे उलटून गेल्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा मुद्दा विधानपरिषद सदस्य हेमंत पाटील यांनी लक्षवेधी द्वारे विधान परिषदेत उपस्थित केला होता."हा पुतळा नेमक्या किती दिवसांत उभारला जाणार?" असा प्रश्न त्यांनी सरकारकडे केला.


यावर उत्तर देताना राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी, "पूर्ण माहिती घेतल्यानंतरच मी याबाबत बोलू शकेन. सन्माननीय सदस्यांना संपूर्ण माहिती घेऊन कळवू," असे सांगितले.

या चर्चेदरम्यान पीठासीन अधिकारी म्हणून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, हा विषय केवळ एका सदस्यापुरता मर्यादित नसून जनतेशी निगडित आहे. अधिवेशन सुरू असताना सरकारने आठ दिवसांच्या आत याबाबत सविस्तर लेखी निवेदन सादर करावे, अशी त्यांनी विनंती केली.

तसेच समृद्धी महामार्गावर सुरू असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या २२ फूड जॉईंट्सबाबत प्रत्यक्षात सुविधा उपलब्ध नसल्याच्या तक्रारी येत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. संबंधित अधिकाऱ्यांकडून त्या २२ ठिकाणांची सकाळी व संध्याकाळी स्थिती दर्शवणारे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून पुढील आठवड्यात दाखवावे, अशीही त्यांनी सूचना केली.




"आम्ही आमदारांनी वारंवार सांगण्यापेक्षा प्रशासनानेच प्रत्यक्ष स्थिती स्पष्ट करावी. आम्हाला व संबंधित आमदारांना प्रत्यक्ष दाखवा," असे त्यांनी नमूद केले. महिलांच्या स्वच्छतागृहांच्या सुविधांबाबतही समस्या कायम असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. "मी स्वतः नुकतीच नाशिकला जाऊन आले असून पुन्हा भेट देणार आहे. कागदोपत्री कामे पूर्ण दाखवली जात असली तरी प्रत्यक्षात काही ठिकाणी सुविधा उपलब्ध नाहीत, अशा तक्रारी लोकांकडून येत आहेत. सुपरव्हिजनमध्ये काही त्रुटी राहात आहेत का, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे," असे त्या म्हणाल्या.



समृद्धी महामार्गावरील सुविधा, रेस्टॉरंट्स व सेवा केंद्रांची अचूक माहिती गुगल मॅपवर अद्ययावत करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले, जेणेकरून प्रवाशांना प्रत्यक्ष सुरू असलेल्या सुविधा सहज उपलब्ध होतील.

## संपादकीय

# ‘थेट बँकेत जमा’, तरी घोटाळ्यांची कीड!

‘एक रुपयातील फक्त १५ पैसे लाभार्थीपर्यंत पोहोचतात’, अशी कबुली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी दिली होती. त्यावरून भाजपचे नेते काँग्रेसची नेहमी खिल्ली उडवतात. ‘आमच्या सरकारने लाभार्थींच्या थेट बँक खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात केल्याने सरकारी योजनांमधील पैसे हडप करण्यास लगाम बसला’, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमी अभिमानाने करतात. आधार कार्डाला व ते बँक खात्यांशी जोडण्याला मोदींनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना विरोध केला होता, हे विसरले जाते. काँग्रेसला जमले नाही ते मोदी सरकारने करून दाखवले, असाच भाजपचा अभिनिवेश असतो. सरकारी योजनांमध्ये लाभार्थींच्या थेट बँक खात्यात रक्कम जमा होऊ लागल्याने मध्यस्थ, सरकारी अधिकाऱ्यांकडून पैसे लंपास करण्याच्या गैरकृत्याला आळा बसला. पण गैरफायदा उकळणाऱ्या प्रवृत्ती काही कमी नसतात. राजस्थानात केंद्र व राज्य सरकारच्या तीन विविध योजनांमध्ये लाभार्थींसाठी असलेली रक्कम मध्यस्थ आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या साखळीने कशी हडप केली हे प्रकरण ‘इंडियन एक्स्प्रेस’ने उजेडात आणले आहे. केंद्र सरकारने २४ फेब्रुवारी २०१९ पासून लागू केलेली महत्त्वाकांक्षी ‘पीएम-किसान’ योजना, राजस्थान सामाजिक सुरक्षा निवृत्तिवेतन योजना, आपत्ती व्यवस्थापन अशा तीन योजनांमधील लाभार्थींच्या मदतीवर दलालांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या साथीने डल्ला मारला आहे. त्याच वेळी हरियाणा सरकरच्या ‘आयडीएफसी फर्स्ट’ बँकेच्या चंडीगढ शाखेत ५९० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे समोर आले. बँकेचे कर्मचारीही या गैरव्यवहारात सहभागी होते. मोठा आर्थिक फटका बसल्यावर हरियाणा सरकारने आता सर्व ठेवी व रक्कम राष्ट्रीयीकृत बँकांत ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. राजस्थानमधील सरकारी योजनांतला घोटाळा तर धक्कादायकच. तेथील सर्व प्रकरणांतले एक साम्य म्हणजे; लाभार्थींच्या आधार कार्डची प्रत मिळवून वा आधार कार्डवरील माहिती जमा करून सरकारी योजनांचा निधी हडप करण्यात आला. एका प्रकरणात गावकऱ्याकडे मध्यस्थाने आधार कार्डाची प्रत मागितली व त्याला सरकारी योजनेतील निम्मी रक्कम देण्याचे आश्वासन दिले. काही दिवसांनी मध्यस्थाने पाच हजार दिले. पण कोणत्या योजनेतून लाभ मिळाला याबाबत गावकरी अनभिज्ञ होता. दुसऱ्या प्रकरणात २५ वर्षीय युवकाच्या बँक खात्यात सरकारी योजनेचे ३३ हजार रुपये जमा झाले. त्याने तर कधीच सरकारी योजनेसाठी अर्ज दाखल केला नव्हता. सायबर विभाग व सरकारी यंत्रणांकडे तक्रार केल्यावर पोलिसांनी छायाप्रत (‘झेरॉक्स’) केंद्राच्या मालकाला अटक केली. कधी तरी हा युवक त्या दुकानात गेला असता त्या छायाप्रतीचा वापर सरकारी योजनेसाठी करण्यात आला होता. ‘पीएम – किसान’ या महत्त्वाकांक्षी योजनेत असेच अनेक गैरप्रकार राजस्थानमध्ये उघडकीस आले. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी सहा हजार रु. तीन टप्प्यांत जमा होतात. योजनेतील त्रुटी दलालांनी हेरल्या. राजस्थानात मनोहर ठाणा या गावातील काही जणांनी गुजरात, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, आंध्र प्रदेश वा हिमाचल प्रदेशात जमीन दाखवून सरकारी अनुदान लाटले. लाभार्थींच्या मदतीसाठी नेमण्यात आलेल्या ‘ई-मित्रां’नीच गैरफायदा घेतला. दोन- तीन वर्षे वापरात नसलेल्या बँक खात्यातील रक्कम दलालांनी परस्पर वळती केल्याचे प्रकार घडले; ती रक्कम दलालांनी परस्परांमध्ये वाटून घेतली. राजस्थान सरकारच्या वतीने वृद्ध, विधवा, एकल महिला, छोटे शेतकरी आणि अपंगांना दरमहा १३०० रुपये निवृत्तिवेतन दिले जाते. ई-मित्रांनी त्यावरही हल्ला मारला. अपात्रांना गाठून त्यांच्याकडून त्यांची वैयक्तिक माहिती जमा करायची, यापैकी काही जण ४० टक्क्यांपेक्षा अधिक अपंग असल्याची खोटी प्रमाणपत्रे तयार करून मग त्यांनाही लाभार्थी करून, प्रत्यक्षात मिळणारी रक्कम ई-मित्र वा दलालांनीच हडप करायची, असा हा प्रकार.

## संस्कृत सुभाषित

अधनाद्धि निर्वन्तते ज्ञातय: सुहृदो द्विजा :
अपुष्पाद्फलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिण:।।
(उद्योगपर्व, अध्याय ७२, २० महाभारत)

अर्थ : ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

## गुरु वचन

### कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत–घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत–घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वत:ला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ८७०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | | 2 | | 6 | | 4 | 5 |
| 5 | | | 1 | | | | | 8 |
| 8 | 2 | | | 5 | 4 | | | 7 |
| 2 | 5 | | 6 | 9 | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | 1 | 8 | | 2 | 6 |
| 3 | | | 4 | 6 | | | 7 | 2 |
| 1 | | | | | 9 | | | 4 |
| 4 | 7 | | 3 | | 5 | | 6 | 9 |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८६९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 6 | 1 |
| 2 | 6 | 9 | 7 | 1 | 5 | 8 | 4 | 3 |
| 1 | 3 | 5 | 6 | 4 | 8 | 7 | 9 | 2 |
| 4 | 1 | 6 | 5 | 3 | 7 | 2 | 8 | 9 |
| 9 | 7 | 8 | 1 | 6 | 2 | 4 | 3 | 5 |
| 3 | 5 | 2 | 9 | 8 | 4 | 1 | 7 | 6 |
| 6 | 9 | 4 | 8 | 2 | 1 | 3 | 5 | 7 |
| 7 | 2 | 3 | 4 | 5 | 9 | 6 | 1 | 8 |
| 5 | 8 | 1 | 3 | 7 | 6 | 9 | 2 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९६४ – ऑस्ट्रेयन पंतप्रधान अलफंस गरबेच यांनी राजीनामा दिला.
- १९८४ – कुबाताऊ ब्राजील येथे ऑईलमध्ये आग लागल्याने ५०० जण ठार झाले.
- २००८ – क्युबामध्ये तब्बल पन्नास वर्षे राष्ट्राध्यक्ष असलेल्या फिडेल कॅस्ट्रो यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांचे बंधू राऊल कॅस्ट्रो यांना क्यूबाचे नवे राष्ट्राध्यक्ष बनविण्यात आले.
- २००८ – हॉलीवूड दिग्दर्शक शेखर कपूर यांच्या ‘एलिझाबेथ: द गोल्डन एज’ या चित्रपटाला कॉस्ट्यूमसाठी ऑस्कर पुरस्कार मिळाला.

### राष्ट्रीय

- २००७ – कर्नाटक सरकारच्या सुवर्ण ग्रामोदय योजना सुरू करण्यासाठी श्रीनिवास सरदगी गावात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्यक्रमात चार बेरोजगार तरुणांनी विष घेतले.


### जन्म

- १६४३ – अहमद दुसरा तुर्कीचे २१वे सुल्तान यांचा जन्म.
- १९३८ – भारतीय यष्टीरक्षक फारुख इंजीनीअर यांचा जन्म.

### निधन

- १७१३ – परस्सीयाचे प्रथम राजा फ्रीड्रीक यांचे निधन.
- १९७५ – नॅशन ऑफ इस्लाम पक्षाचे नेता ईलीजाह मोहम्मद यांचे निधन.
- १९८२ – भारतीय यष्टीरक्षक जे.के.ईराणी यांचे निधन.
- २००८ – डॉ. श्रीपाद श्रीधर ऊर्फ श्री. श्री. घारे, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि पिंपरी–चिंचवडचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष यांचे निधन.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ८७०



**आडवे शब्द**
१. मराठीत जोकर
३. वार्ताहर
७. वस्तू मिळाल्याची पोहोच
९. नकाराचा शब्द
१०. कंटाळा आल्याचे दाखवणारी (अ.व.)
११. गतिमान
१३. आबालवृद्धांसाठी उपयोगी कल्प–त्यातील वनस्पती
१६. मुलींचे हे नाव बेळगावी मिठाईवरून ठेवतात की नाजुकशा फुलावरून?
१७. गडीमाणसे
२१. पद्धत
२३. कंटाळवणे, रसहीन
२५. ’च’च्या भाषते फुकट
२७. राष्ट्राची सीमा
२९अ. संधी, मोका
३१. विश्वासघातकी
३२. खेळातून बाद, हद्दपार
३३. पदर
३४. दबा धरणे
३६. किरकोळ
३९. नऊ दिवसच टिकणारे अप्रूप!
४२. लबाडीचा हेतू
४२अ. कच्चे लिखाण (इंग्रजी)
४४. कणखर, रांगडा
४५अ. सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
४६. एकाग्र नजर
४८. सजीव–निर्जीव सर्व
५०. रागाचा उद्रेक
५२. एक जंगली फूल
५३. चित्रविचित्र रंगाचा, ठिपक्या ठिपक्यांचा
५४. एक प्रकारे जीवनदान!
५६अ. मन आकर्षून घेणारे
५७अ. कूळकायद्याचे मूळ तत्त्व
६१. तात्काळ, वेगात
६४. सारखा
६६. किटाळ, आळ
६८. पावलोपावली
६९. संत एकनाथांचे गुरु
७१. ’बटण स्टार्ट’मुळे आता ही कालबाह्य! (इंग्रजी)
७२. पावसाची झड
७३. नवरत्नांपैकी प्राणिज रत्न
७४. कारस्थानी
७५. पाताळ, विनाशाची गर्ता
७६. अभिप्राय

**उभे शब्द**
१. सर्वनाश घडवून आणणारे
२. कन्या (संस्कृत)
३. बोरींच्या गावचे काटेरी झाड, ४. काव्यात त्याला
५. वैरी, खटला गुदरणारा
६. अंगातील मस्ती, जोम
७. जन्मदाता
८. अशुभ घटनेचा संशय दर्शवणारा वाकप्रचार
१२. ’बोलीची काढी–बोलाचाच भात’ रांधणारा!
१४. उपवासाचे तांदूळ
१५. साग्रसंगीत
१८. मांडणी
१९. मिसळीतील तर्री
२२. ईर्ष्या, ठाम निश्चय
२४. टाळाटाळ, चुकवाचुकव
२६. वार
२८. तडीपार
२९. मिठाची चव
२९अ. अमावस्या
३०. वारा (संस्कृत)
३१. होमातील आहुती
३२अ. चकवून जाण्याचा मार्ग
३५. सैन्याची तुकडी
३७. घाबरणे, धास्ती घेणे
३८. तफावत, अंतर
३८अ. कणखर (इंग्रजी)
४०. जंगलातील प्राणी
४१. मुलींचे एक नाव
४२. कंप पावणारा
४३. केर
४५. शेवटचे वस्त्र!
४६. पहिला अंक
४७. शेंगेवरील आवरण
४९. संघर्षात रक्त सांडणे
५१. घटस्फोट
५३. दगडाचा पातळ पापुद्रा
५५. गव्हाचे शिजवलेले सत्त्व
५६. खळबळजनक
५८. सेनानायक
५९. राजीनामा
६०. हिंदीतील मूळ, मराठीत वजनदार
६१अ. धान्य साठवणीचे पात्र
६२. डागाळलेला
६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ
६५. मनगटात जोर असलेला
६७. आपला देश
६९. सततचे नामस्मरण
७०. पुरुष
७२. समान, तुल्यबळ

**जम्बो शब्दकोडे क्र. ८६९ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.कुख्यात ३.अमृत ६.कारवाई १०.मत ११.ताजा १२.जय जवान १३.भय १४.कनात १६.गमन १७.मळमळ १९.कनक २२.शिष्य २४.मर २५.कमला २६.नकलाकार २८.मावळण ३०.कानवला ३२.धार ३३.लाचार ३५.टचटचीत ३९.नवनीत ४१.करा ४३. मानव ४४.रचनाकार ४६.नमन ४८.टपाल ५१.जगन्नाथ ५२.वीर ५३.कृपा ५४.सातत्य ५६.जीवन ५८.रात ५९.तपास ६०.धाम ६१.निवारक ६२.हस्त ६४.रसना ६६.जलाशय ६८.हस्तपत्रक ७१.मठ ७३.अनल ७४.गर्व ७५.वाट ७६.सवंगडी ७८.कोय ७९.मालक ८०.परत ८१.नशा ८२.कारा ८३.छाया ८४.नमक

उभे उत्तर : १.कुमक २.ख्यातनाम ३.अजागळ ४.तपन ५.यजमान ६.काजळ ७.रवा ८.वानवा ९.पाय १३.भविष्यकाळ १५.तळमळ १८.मरणयातना १९.कलाकार २०.कडवट २१.धन २२.शिला २३. समाधान २५.कमलाकार २७.कपची २९.वरवर ३१.लाच ३४.चारा ३६.टवटवीत ३७.तमाल ३८.जवळपास ४०.नीच कृत्य ४२.तमन्ना ४५.काळजीवाहू ४६.नग ४७.नथ ४९.पार ५०.असाधारण ५१.जनकजननी ५३.कृपापात्र ५५.तमस ५७.वर ५८.रास्त ६२.हयगय ६३.मस्तवाल ६५.नामवंत ६७.लाल ६९.पटकन ७०.कथानक ७२.ठग ७६.सर ७७.डीन ७८.कोरा ७९.माया

## उपदेशकथा

### स्थितप्रज्ञ...

स्थितप्रज्ञ व्यक्ती, समदर्शी व्यक्ती, ‘पोचलेला’ माणूस असे शब्द आपण नेहमी ऐकतो. त्याची ही काही उदाहरणे– गाडगे महाराजांसारखा सत्पुरुष हरिकीर्तनात दंग असताना मुलगा दगावल्याची तार आल्याचे कळताच ‘ऐसे गेले कोट्यानुकोटी काय रडू एकासाठी’ म्हणत कीर्तनरंग चालू ठेवतो. कोर्टात असहकार आंदोलनातील कार्यकर्त्यांचा खटला चालू असताना बॅ. वल्लभभाई पटेल आपली बाजू मांडत असतात. पत्नी दिवंगत झाल्याची चिठ्ठी हाती येते नि ती चिठ्ठी बाजूला ठेवून ते आपले कर्तव्य पुरे करतात नि मगच घरी जातात. आदी शंकराचार्य मातुश्रींना दिलेल्या वचनानुसार केरळमधील कालडी या आपल्या गावी तिला भेटायला जातात. पुत्र भेटावा या इच्छेने तिने पंचप्राण डोळ्यात आणून साठवलेले. तो भेटला या समाधानाने ती आई नश्वर जगाचा निरोप घेते. गावचे ब्राह्मण अग्नीसंस्कारासाठी येत नाहीत. ‘निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधि: को निषेध:’ अशी चित्तसमता साधलेले आचार्य त्या देहाचे तीन भाग करतात नि एकेक करून नदीकाठी वाहून नेतात.

कथा उपदेश : जीवनभर साधना करूनही पुष्कळांना समदर्शिता साधता आली नाही तर काही मोजक्या व्यक्तींना ती जणू उपजतच लाभलेली आढळते.

## : SMS :

Ek Admi Sadhu Se Bola,
Meri Biwi Bahut Pareshan Karti Hai,
Koi Upay Batao...
Sadhu Bola Saale Upay Hota To Mai Sadhu Kyo Banta..!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.२ | २१.७ |
| अहमदनगर | २८.५ | २१.२ |
| अकोला | ३२.३ | २३.१ |
| अमरावती | ३१.७ | २३.२ |
| बीड | ३२.५ | २३.३ |
| भंडारा | ३२.१ | २२.२ |
| बुलढाणा | २७.३ | १२.९ |
| चंद्रपूर | ३२.३ | २३.३ |
| चेन्नई | ३४.५ | २२.५ |
| नवी दिल्ली | २७.६ | १६.६ |
| धुळे | ३१.३ | २१.७ |
| गोंदिया | ३१.४ | २१.३ |
| जळगाव | ३१.७ | २१.३ |
| कोल्हापूर | ३०.९ | २०.८ |
| लातूर | ३०.७ | २१.५ |
| मुंबई | ३३ | २४.९ |
| नागपूर | ३१.६ | २२ |
| नांदेड | ३३.३ | २२.८ |
| नंदूरबार | २९.६ | २१.६ |
| नाशिक | २९.९ | १९.५ |
| पुणे | २८.४ | २०.७ |
| पंढरपूर | ३१.१ | २३.९ |
| सातारा | ३०.५ | १९.४ |
| सांगली | ३२.२ | २१.६ |
| सोलापूर | ३२.१ | २४.१ |
| वर्धा | ३२.७ | २२.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम कलेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:च्या योजनांनूसार कामे होतील. तक्रार होऊ शकते.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही.

**वृश्चिक :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कौटूंबिक वातावरण आनंदी राहिल्याने कार्यकौशल्य वाढेल. संपत्ती संबंधी कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पुर्व फायद्याच्या मार्गात विस्तार होईल. ध्येय समोर ठेवून काम केल्यास यश मिळेल.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम बुद्धीचा वापर केल्यास कामात प्रगती होण्याचे योग आहेत. मनाजोगे लाभ मिळू शकतील.

**मकर :** शुभ रंग : नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम नशिबाने प्रगती, धार्मिक लाभ व मार्गदर्शन आपल्यासाठी भविष्यवर्धक राहतील.

**सिंह :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम पूर्वी केलेल्या कामाचे शुभ परिणाम आज पहावयास मिळेल. संपत्तीत वाढ होईल. घरासंबंधी समस्या राहू शकते.

**कुंभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर कामात अडथळे, तणाव यासारख्या समस्या वाढतील. मनाचा संयम ढासळू न देता कामे करा.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम प्रतिष्ठित लोकांशी भेटी हातील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : दक्षिण महत्वपूर्ण गोष्टींचा विचार कराल. आळस सोडून देऊन सक्रीय व्हावे लागेल. भेट वस्तू मिळेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:विष्कुम्भ |
| २५ फेब्रुवारी २०२५ | २५:२८:०८+ |
| बुधवार | करण:बालव १५:४६:२३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव |
| फाल्गुन शके | २६:४१:१३+ |
| संवत्– १९४७ | सूर्य:कुम्भ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– फाल्गुन | मुस्लिम मास – रमजान |
| ऋतु– हेमंत | तारीख – ७ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:नवमी २६:४१:१३+ | शुभ दिवस |
| नक्षत्र:रोहिणी १३:३८:२८ | |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्यातील राजकीय हिंसाचाराविरोधात काँग्रेसचे पोलीस आयुक्तांना निवेदन

पुणे (दैनिक संध्या) : शहरात वारंवार घडणाऱ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमधील हिंसाचाराच्या घटनांविरोधात पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना निवेदन देण्यात आले. शहरात कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पोलीस आयुक्तांना निवेदन सादर करताना माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार मोहन जोशी, दिप्ती चवधरी, प्रदेश खजिनदार ॲड. अभय छाजेड, संजय बालगुडे, पुणे महापालिका गटनेते ॲड. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम, स्थायी समिती सदस्य प्रशांत जगताप, नगरसेवक रफिक शेख, अजित दरेकर, अविनाश बागवे, सुनिल मलके, जयंत किराड, मेहबुब नदाफ, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, चेतन अगरवाल, ब्लॉक अध्यक्ष रवींद्र माझीरे, अक्षय जैन, किशोर मारणे, नुरूद्दीन सोमजी, नागेश भालेराव आदी पदाधिकारी उपस्थित होते. शहरातील राजकीय वादातून उद्भवणाऱ्या हिंसक घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई करावी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करावी, अशी अपेक्षा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### एमएचटी-सीईटी, एनडीए प्रवेश परीक्षा एकावेळी, विद्यार्थ्यांचे काय होणार?

पुणे (दैनिक संध्या) : राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी) घेतली जाणारी एमएचटी-सीईटी आणि केंद्रीय लोक सेवा आयोगातर्फे (यूपीएससी) होणारी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) प्रवेश परीक्षा या दोन्ही परीक्षा एकाच कालावधीत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे दोन्ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, संबंधित विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाकडे अर्ज केल्यास त्यावर सकारात्मक विचार करण्याचे स्पष्टीकरण सीईटी कक्ष संबंधितांनी दिले आहे. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषधनिर्माण शास्त्र अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एमएचटी-सीईटी ही प्रवेश परीक्षा सीईटी कक्षा मार्फत आयोजित करण्यात येते. यंदा ही परीक्षा एप्रिल आणि मे अशा दोन सत्रांत घेतली जाणार आहे. त्यांपैकी एप्रिल सत्रातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (पीसीएम) गटाची परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू होणार आहे. तर, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) प्रवेशासाठीची यूपीएससीतर्फे राष्ट्रीय पातळीवर प्रवेश परीक्षा घेतली जाते. एप्रिल आणि सप्टेंबर अशी वर्षातून दोन वेळा ही परीक्षा होते. त्यानुसार यंदा १२ एप्रिल रोजी ही परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. एमएचटी-सीईटी आणि एनडीए प्रवेश परीक्षा या बारावीनंतर देता येतात. या दोन्ही परीक्षा एकाच सत्रात होणार असल्याने बारावीची परीक्षा दिलेल्या, प्रामुख्याने सैनिकी शाळांतील विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे. दोन परीक्षा एकाचवेळी होत असल्याबाबत एक पालक म्हणाले, दोन्ही प्रवेश परीक्षा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या आहेत. त्यातही एनडीएच्या प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना दोन वर्षे अधिक कठोर मेहनत घ्यावी लागते. दोन्ही परीक्षा एकाच वेळी होत असल्याने विद्यार्थ्यांची संधी हिरावली जाऊ शकते. ही बाब लक्षात घेऊन वेळापत्रकात बदल करण्याची गरज आहे. दरम्यान, संबंधित विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाकडे अर्ज करावा, त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सीईटी कक्षाकडून स्पष्ट करण्यात आले.

### सध्याचे दशक भारतीय लष्करासाठी निर्णयाक : दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख

पुणे (दैनिक संध्या) : 'सध्याचे दशक भारतीय लष्करासाठी परिवर्तनाचे निर्णायक दशक आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे, स्वीकार करणे आणि प्रभावी एकत्रीकरण करणे या प्रक्रिया आत्मनिर्भरतेची भक्कम पायाभरणी करणारी आहे,' असे प्रतिपादन लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी केले. विद्यार्थ्यांचे संशोधन, नवोन्मेष आणि उद्योजकता देशाच्या विकासाला थेट हातभार लावणार आहे, असेही त्यांनी नमूद केले. 'आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या (एआयटी) ३२ व्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात सेठ बोलत होते. लेफ्टनंट जनरल संदीप जैन, एआयटीचे अध्यक्ष मेजर जनरल चक्रवर्ती, संचालक मेजर जनरल उदय शंकर सेनगुप्ता या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात उद्योग, नवोन्मेष आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानासाठी थर्मेक्सच्या माजी अध्यक्षा, माजी खासदार अनु आगा यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात उद्योजक पुरू गुप्ता, मेजर (नि.) सिप्रा मजुमदार यांना माजी विद्यार्थी पुरस्काराने गौरवण्यात आले. तर 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ बेस्ट ऑल राउंड स्टुडंट ट्रॉफी' पुरस्कार अनुष्णा पनवार या विद्यार्थिनीला, जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ पुरस्कार कुशी शाह, अनुष्णा पनवार ईशा राणा, अकाना सदरदार यांना, राजपूत रजिमेंट ट्रॉफी पुरस्कार वंशिका या विद्यार्थिनीला, डॉ. सागर राणे, डॉ. दीपिका बिरारी यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, प्रशासकीय उत्कृष्टता पुरस्कार नितीन सुखदेवे, इमदाद अली काझी यांना प्रदान करण्यात आला.

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांच्या भाजप नेतृत्वाला कानपिचक्या !

पुणे (दैनिक संध्या) : 'प्रत्येक राज्याची कामगिरी पारदर्शकपणे जनतेसमोर यायला हवी. त्यासाठी विधिमंडळाचा एक राष्ट्रीय विधिमंडळ निर्देशांक असावा. या निर्देशंकाच्या माध्यमातून प्रत्येक राज्यातील सरकारच्या कामांचे मूल्यमापन करता येईल आणि हे मूल्यांकन ठोस निष्कर्षांवर करणे गरजेचे आहे,' असे मत दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांनी व्यक्त केले. 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्न्मेंट' यांच्या वतीने आयोजित भारतीय छात्र संसदेचे उद्घाटन गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई, जर्मनीच्या हॅम्बर्ग येथील हवामान बदल व्यवस्थापनाचे प्रा. वॉल्टर लील फिल्हो, विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, विद्यार्थी प्रतिनिधी सुमित खैरे, पायल झा, निखिल मिश्रा आणि अक्षिता सक्सेना या वेळी उपस्थित होते. गुप्ता म्हणाले, 'संसदेतील प्रतिनिधी कोणत्याही पक्षाचे नसतात. ते जनसामान्यांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे संसदेचे पावित्र्य राखणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. या ठिकाणी विवेक, संयम, तर्क-वितर्क, समस्यांच्या मुद्द्यांवर चर्चा होणे आणि त्यात खेळ भावना असणे गरजेची असते. संसदेतील संवाद, संस्कृती बळकट करण्यासाठी विधायक चर्चा आणि परस्पर आदर सन्मान जपण्याची गरज आहे.' 'राजकारण आणि खेळ हे एकाच नाण्याचे दोन पैलू आहेत. संसदेमध्ये देशाचा विकास, परंपरा आणि भविष्यनिर्मितीवर चर्चा व्हावी. खेळामध्ये जसे देशाच्या झेंड्यासाठी खेळले जाते; तसेच राजकारण्यांनी यासाठीच कार्य करावे. लोकशाही हे पवित्र मंदिर आहे. येथे झालेले समाधान संपूर्ण समाजासाठी असते.

# प्रदेश भाजपा पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केली घोषणा

## १२ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १२ चिटणीस, कोषाध्यक्ष, विविध मोर्चांच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर

पुणे (दै. संध्या) :




भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मंगळवारी पक्षाच्या नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. 12 उपाध्यक्ष, 6 सरचिटणीस,12 चिटणीस, कोषाध्यक्ष, सह कोषाध्यक्ष, मुख्य प्रवक्ता, विविध मोर्चाच्या अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती श्री. चव्हाण यांनी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. जुन्या आणि नव्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची पदाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे श्री. चव्हाण म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, तसेच राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, केंद्रीय संघटन मंत्री बी. एल.संतोष, सह संघटन मंत्री शिवप्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रमुख नेते यांच्याशी चर्चा केल्यानंतर या कार्यकारिणीची घोषणा केल्याचे श्री. चव्हाण यांनी नमूद केले.

यावेळी, श्री. चव्हाण म्हणाले की पाठोपाठ लागलेल्या निवडणुकांच्या आचार संहितेमुळे कार्यकारिणीची घोषणा लांबणीवर पडली होती. निवडणुकांची धामधूम संपल्यानंतर भाजपाला बळकटी देऊन भाजपाची विचारधारा तळागाळात पोहोचवण्यासाठी नव्या कार्यकारिणीची गरज लक्षात घेऊन घोषणा करण्यात आली आहे.

प्रदेश उपाध्यक्ष म्हणून अतुल काळसेकर, भारती पवार, संजय कोडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, चैतन्यबापू देशमुख, प्रिया शिंदे, सुजय विखे पाटील, अर्चना पाटील चाकुरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेश सरचिटणीस म्हणून आ.निरंजन डावखरे, आ.योगेश सागर, आ. संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे या सहा जणांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्य प्रवक्ते म्हणून नवनाथ बन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांची यादी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे : अतुल काळसेकर (उपाध्यक्ष, कोकण विभाग), भारती पवार (उपाध्यक्षा, उत्तर महाराष्ट्र), संजय कौडगे (उपाध्यक्ष, मराठवाडा), संजय भेंडे (उपाध्यक्ष, विदर्भ), रामदास तडस (उपाध्यक्ष, विदर्भ), केशव उपाध्ये (उपाध्यक्ष, मुंबई), प्रवीण पोटे (उपाध्यक्ष, विदर्भ), गोपीचंद पडळकर (उपाध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र), चैतन्यबापू देशमुख (उपाध्यक्ष, मराठवाडा), प्रिया शिंदे (उपाध्यक्षा, पश्चिम महाराष्ट्र), सुजय विखे (उपाध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र), अर्चना पाटील चाकूरकर (उपाध्यक्षा, मराठवाडा), निरंजन डावखरे (सरचिटणीस, कोकण), योगेश सागर (सरचिटणीस, मुंबई), संजय कुटे (सरचिटणीस, विदर्भ), माधवी नाईक (सरचिटणीस, कोकण), राजेश पांडे (सरचिटणीस, पश्चिम महाराष्ट्र), सुनील राणे (सरचिटणीस, मुंबई), प्रशांत ठाकूर (चिटणीस, कोकण), मंगेश चव्हाण (चिटणीस, उत्तर महाराष्ट्र), परिणय फुके (चिटणीस, विदर्भ), वर्षा डहाळे (चिटणीस, पश्चिम महाराष्ट्र), संतोष जनाटे (चिटणीस, कोकण), संजय जगताप (चिटणीस, पश्चिम महाराष्ट्र), अर्चना डेहनकर (चिटणीस, विदर्भ), रोहिणी नायडू (चिटणीस, उत्तर महाराष्ट्र), राम सातपुते (चिटणीस, पश्चिम महाराष्ट्र), प्रवीण घुगे (चिटणीस, मराठवाडा), रेखा कुलकर्णी (चिटणीस, मराठवाडा), भैरवी वाघ (चिटणीस, उत्तर महाराष्ट्र), मिहीर कोटेचा (कोषाध्यक्ष, मुंबई), अरुण लखानी (सह-कोषाध्यक्ष, विदर्भ), रवींद्र अनासपुरे (मुख्यालय प्रभारी, पश्चिम महाराष्ट्र), विश्वास पाठक (मुख्यालय सह-प्रभारी, मुंबई), नवनाथ बन (मुख्य प्रवक्ता, मुंबई), कृष्णराज महाडिक (युवा मोर्चा अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र), चित्रा वाघ (महिला मोर्चा अध्यक्ष, मुंबई), रामकृष्ण वेताळ (किसान मोर्चा अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र), योगेश टिळेकर (ओबीसी मोर्चा अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र), विश्वजित गायकवाड (एससी मोर्चा अध्यक्ष, मराठवाडा), देवराव होळी (एसटी मोर्चा अध्यक्ष, विदर्भ), नरेंद्र पवार (भटके विमुक्त मोर्चा अध्यक्ष, कोकण) आणि इद्रिस मुलतानी (अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष, मराठवाडा).

## करवाढ करणार नाही पण उत्पन्न वाढविणार ! भिमालेंनी सांगितले सूत्र

पुणे (दै. संध्या) :

पुणे महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या कोणाच्या हाती जाणार याचा निर्णय झाला असून माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांच्याकडे स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपकडून भिमाले यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यांची बिनविरोध निवड झाली. स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतल्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी आपले नियोजन सांगितले. शहरात सुरू असलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याबरोबरच करवाढ न करता पुणेकरांना दिलासा देताना महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थायी समितीच्या अध्यक्षपदाचा पदभार भिमाले यांनी स्वीकारला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. महापौर मंजूषा नागपुरे, सभागृहनेते गणेश बीडकर, शहराध्यक्ष धीरज घाटे या वेळी उपस्थित होते. भिमाले म्हणाले, 'वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून पुणेकरांची गरज लक्षात घेऊन नवनवे प्रकल्प आणले जातील. पुण्यासह लगतच्या परिसराच्या विकासाचे 'व्हिजन' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले आहे.

## पुण्यात 'Oslo: A Tail of Promise' चित्रपटाचा भव्य प्रीमियर

पुणे (दै. संध्या) :

गोव्यात गेल्या नोव्हेंबरमध्ये पार पडलेल्या International Film Festival of India (IFFI) च्या ५६व्या आवृत्तीत भावनिक प्रतिसाद मिळाल्यानंतर Oslo: A Tail of Promise या चित्रपटाचा पुण्यात शनिवारी भव्य प्रीमियर झाला. या सोहळ्याला चित्रपटातील कलाकार, तांत्रिक टीम तसेच सादरकर्ते आणि निर्माता जॉन अब्राहम उपस्थित होते.

खऱ्या घटनांवर आणि वास्तव अनुभवांवर आधारित हा नॉन-फिक्शन चित्रपट माणूस, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील नात्याचा भावनिक प्रवास मांडतो. जखमी भूतकाळ असलेला सायबेरियन हस्की 'ओस्लो' आणि स्वतःच्या




अस्तित्वाचा शोध घेत असलेली पूजा यांच्यात निर्माण होणाऱ्या नात्यातून प्रेम, जिद्द आणि परस्पर उपचारांची प्रभावी कथा उलगडते. प्राणी आणि माणूस यांच्यातील सहअस्तित्वाचा संदेश देत हा चित्रपट निसर्गाशी असलेल्या मानवी नात्याला अधोरेखित करतो.

### IFFI नंतर प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

चित्रपटात Protecterra Ecological Foundation च्या संस्थापिका पूजा आर. भाले आणि 'ओस्लो' यांच्यातील अतूट नातं केंद्रस्थानी आहे. समाजाच्या चौकटींपलीकडे जाऊन निसर्गासोबत जगण्याचा त्यांचा प्रवास या चित्रपटातून संवेदनशीलपणे मांडण्यात आला आहे. निर्माते जॉन अब्राहम यांनी सांगितले की, "प्राणी आपल्याला शिकवण्यासाठी असतात. ओस्लो आणि पूजामधील नातं करुणा आणि सहजीवनाची जाणीव करून देतं." निर्माते अमेय गोसावी यांच्या मते, हा चित्रपट स्त्रीच्या सामर्थ्याचा वेगळ्या दृष्टिकोनातून घेतलेला वेध आहे.

दिग्दर्शिका इशा पुंगलिया यांनी चित्रपट वास्तवाशी प्रामाणिक ठेवत भावनिक सत्याला प्राधान्य दिले आहे. "निसर्गाशी आणि भाषेपलीकडील नात्यांशी संवाद साधणारी ही कथा आहे," असे त्या म्हणाल्या.

JA Entertainment, Protecterra Ecological Foundation आणि Vaanar Nirmit यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मित हा चित्रपट मानवी संवेदना, करुणा आणि सहअस्तित्वाचा प्रभावी संदेश देणारा ठरत आहे.

## 'आयसीएआय' पुणे शाखेला राष्ट्रीय व विभागीय स्तरावरील चार पुरस्कार

पुणे (दै. संध्या) :




दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील दोन, तर विभागीय स्तरावरील दोन अशा चार पुरस्कारांवर 'आयसीएआय पुणे'ने नाव कोरले आहे. २०२५-२६ या वर्षामधील उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय व विभागीय स्तरावर सर्वोत्तम शाखा व सर्वोत्तम विद्यार्थी (वेस्टर्न इंडिया चार्टर्ड अकाउंटंट्स स्टुडंट्स असोसिएशन- विकासा) शाखेचा द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. नुकत्याच झालेल्या वार्षिक समारंभात 'आयसीएआय'चे अध्यक्ष सीए चरणज्योत सिंग नंदा व उपाध्यक्ष सीए प्रसन्न कुमार डी. यांच्या उपस्थितीत या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण झाले. दरवर्षी संस्थेच्या राष्ट्रीय व पश्चिम विभागीय कार्यालयातून सर्वोत्तम शाखेचे, तसेच विद्यार्थी शाखेचे पुरस्कार दिले जातात. राष्ट्रीय स्तरावरील शाखांमध्ये पुणे शाखेने आणि 'विकासा' या विद्यार्थी शाखेने पात्रतेच्या निकषांप्रमाणे काम करत हे पुरस्कार प्राप्त केले. 'आयसीएआय'च्या पुणे शाखेचे अध्यक्ष सीए सचिन मिणियार व 'विकासा पुणे'च्या अध्यक्षा सीए प्रज्ञा बंब यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए राजेश अग्रवाल, सीए रेखा धामणकर व सीए अभिषेक धामणे, पुणे शाखेचे उपाध्यक्ष सीए प्रणव आपटे, सचिव सीए निलेश येवलेकर, खजिनदार सीए नेहा फडके, व्यवस्थापन समिती सदस्य सीए ऋषिकेश बडवे, सीए सारिका दिंडोकार, सीए नंदकुमार कदम, सीए प्रितेश मुनोत, 'विकासा पुणे'चे उपाध्यक्ष श्रीयांश नवले, सचिव संयोगिता कुलकर्णी, खजिनदार वेदांत वेदुआ, सहसचिव प्रांजल देवकर, सहखजिनदार जय येडे व एडिटर हेड वैभव अंभोरे आदी उपस्थित होते. सीए सचिन मिणियार म्हणाले, "वर्षभर आयसीएआय पुणे शाखेतर्फे 'वन एट अ टाइम' या संकल्पनेनुसार विविध कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे, राष्ट्रीय परिषदा, सामाजिक उपक्रम, सनदी लेखापालांसाठी कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये अनेकांचे सहकार्य, मार्गदर्शन व विश्वास लाभला. त्याबद्दल सर्वांचे आभार मानून हे पुरस्कार 'आयसीएआय' पुणे शाखामधील सर्व सदस्य, विद्यार्थी आणि कष्टकरी कर्मचाऱ्यांना समर्पित करतो. २०२५-२६ या वर्षात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबवून हा पुरस्कार आपल्या सीए शाखेला मिळाला आहे."

## 'एमपीएससी'च्या माजी अध्यक्षांची ठाम भूमिका !

पुणे (दै. संध्या) :

'आजकाल स्टेटस सिम्बॉल म्हणून मुलांना इंग्रजी शाळेत टाकले जाते. मात्र, मुलांनी मराठी भाषेतूनच शिक्षण घेणे गरजेचे आहे. हा बदल घडवण्याची सुरुवात शासकीय अधिकाऱ्यांनीच केली पाहिजे,' अशी भूमिका महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांनी मांडली. शासकीय अधिकाऱ्यांच्या मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात निंबाळकर बोलत होते. संमेलनाध्यक्ष महेश भागवत, माजी सहकार आयुक्त अनिल कवडे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, गुजरातचे जीएसटीचे प्रधान आयुक्त सुरेंद्रकुमार मानकोसकर या वेळी उपस्थित होते. निंबाळकर म्हणाले, 'आपला देश विविध भाषा, प्रांत यांनी नटलेला आहे. शासकीय अधिकाऱ्यांना या विविध भागांमध्ये काम करण्याची संधी मिळत असते. त्यांना ज्या-ज्या भागात जाण्याची संधी मिळते त्यांनी त्या-त्या ठिकाणच्या अनुभवांवर लेखन केले पाहिजे. विविध भाषांमधील पुस्तके आपल्या भाषेत येणे गरजेचे आहे.' 'शासकीय सेवा हे समाजसेवेचे उत्तम माध्यम आहे. माणसांना सर्वाधिक पाहण्याची, अनुभवण्याची संधी अधिकाऱ्यांना मिळते. या संधीचा उपयोग आपण कसा करतो, हे महत्त्वाचे आहे. प्रतिभेचे, भावनेचे प्रकटीकरण जसे आवश्यक आहे, तसेच, आत्मचिंतनही सध्याच्या काळात गरजेचे झाले आहे. आपण काय कमावले आणि काय गमावले हे पडताळून पाहायला हवे,' अशी भावना कवडे यांनी व्यक्त केली. साहित्याच्या माध्यमातून नेमकेपणाने बोट ठेवता यायला हवे. प्रबोधनाचा मार्ग हा साहित्यनिर्मितीतून जातो, हे लक्षात ठेवून चांगले आचार-विचार समाजात रुजवण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# "मनुवादी विचारांविरोधातील लढ्यासाठी कार्यकर्त्यांकडून बळ"

### पुणे काँग्रेस मेळाव्यात हर्षवर्धन सपकाळ यांचा भाजपवर निशाणा

पुणे (दै. संध्या) :

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर प्रथमच प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ यांनी पुणे शहराला भेट दिली. तसेच मागील आठवड्यामध्ये मा. सपकाळ साहेब यांच्या वक्तव्याबाबत काँग्रेस भवन येथे भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हिंसक मोर्चा काढून दगडफेक केली होती. या पार्श्वभूमीवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सवांद साधण्याकरीता या मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यात जखमी कार्यकर्त्यांची विचारपूस व सत्कार प्रदेशाध्यक्ष मा. सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आला.

पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी मा. हर्षवर्धन सपकाळ यांचे स्वागत व सत्कार करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यानंतर व पुणे मनपा गटनेते रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम व सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांसह प्रदेशाध्यक्षांचा सत्कार केला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, "मला लाज वाटते की, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री राजकीय टिपणी आणि बदला घेण्याकरीता खोटे बोलतो. आपल्या महाराष्ट्राची आण-बाण-शान व स्वाभिमान असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल खोटे बोलण्याचे पातक जर देवेंद्र फडणवीस करीत असतील तर त्यांना आम्ही सोडणार नाही. आपल्या बाजूला शौर्य व इतिहास आहे. दुर्दैवाने फुटीर वादाचा इतिहास देखील आपल्याला थोड्या काळाचा आहे, परंतु एक लक्षात असू द्यात जे उडून गेले ते कावळे व जे उरले ते खरे मावळे.

पुण्यात असलेल्या केंद्रातील एका मंत्राने तर आपल्या आजच्या मेळाव्याचे समजताच सर्व बैठका रद्द करून १०-१० मिनिटाला माहिती घेत होते. पुणे शहर काँग्रेसच्या मेळाव्याच धसका भाजपाच्या नेत्यांनी घेतलेला दिसून येतो. पुण्याच्या पावन भूमीमध्ये गाढवाचा नांगर फिरविण्याचे पातक इतिहासात करण्यात आले होते, याच मनुवादी विचारांचा माणूस आज महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे. परंतु येणाऱ्या भविष्यकाळात स्वराज्य व सुराज्य



निर्माण करण्यासाठी आपल्याला सोन्याचा नांगर फिरवायचा आहे. मनुवृत्ती ही गाढवाचा नांगर तर संविधान हे सोन्याचा नांगर आहे. पोलीसांनी सुध्दा लक्षात असू द्यावे त्यांचे ब्रीद वाक्य 'सद रक्षणाय् खल निग्रनाय्' असे आहे. नव्या परिवर्तनाची सुरवात पुण्यातून झाली आहे आणि त्याची कास धरून आपल्याला पुढे जायचे आहे."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा प्राची दुधाने यांनी केले तरी आभार माजी नगरसेवक अजित दरेकर यांनी मानले.

यावेळी मेळाव्यास काँग्रेसचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## डेरवण कॅन्सर डिटेक्शन सेंटरला

# रेफरिंग सेंटरची मान्यता द्या

**मुंबई (दै. संध्या) :**

■ आमदार शेखर निकम यांची कोकणाच्या आरोग्यासाठी ठोस मागणी

अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५-२६ दरम्यान चिपळूण–संगमेश्वर विधानसभा मतदार संघाचे आमदार शेखर निकम यांनी कोकणातील आरोग्य सुविधांबाबत अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत ग्रामीण रुग्णांसाठी सक्षम आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली. डेरवण येथील बी. के. एल. वालावलकर




हॉस्पिटल निदान व संशोधन केंद्रामार्फत चालवण्यात येणाऱ्या अत्याधुनिक कॅन्सर डिटेक्शन सेंटरला शासनाचे अधिकृत रेफरिंग सेंटर म्हणून मान्यता देण्यात यावी, अशी ठोस मागणी आमदार शेखर निकम यांनी सभागृहात मांडली.

या हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक यंत्रसामग्री, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध असून, शासनाकडून अधिकृत मान्यता मिळाल्यास कोकणातील ग्रामीण भागातील हजारो रुग्णांना वेळेवर तपासणी व उपचाराचा मोठा लाभ होणार आहे. कॅन्सरसारख्या गंभीर आजारात लवकर निदान अत्यंत महत्त्वाचे असल्याने डेरवण येथील कॅन्सर डिटेक्शन सेंटरला अधिकृत मान्यता मिळणे कोकणवासीयांसाठी दिलासादायक ठरणार असल्याचे आमदार निकम यांनी या वेळी नमूद केले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील तसेच मौजे मु. पो. बारबावळ, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल सौ. कविता सचिन पाष्टे, उ.व. २५, धंदा -मजुरी, रा. द्वारा नामदेव संतू भालेकर, मु. पो. कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी सांगितलेवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की,

आमचे आशिलांचा विवाह सात वर्षांपुर्वी बांद्रा, मुंबई येथे रजिस्टर पध्दतीने सचिन नामदेव पाष्टे, रा. मु. पो. मोरबावळे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथे झाला असून सदरहू विवाह संबंधातून आमचे आशिलांस त्यांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांचेपासून एक मुलगी वय वर्षे ६ ही सावित्रीबाई फुले या दवाखान्यात झालेली आहे. विवाह झाल्यानंतर आमचे आशिलांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांनी काही दिवस व्यवस्थीत नांदविले. सदर आमचे आशिल हे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांचेबरोबर स्वतंत्र त्यांचे सासु-सासऱ्यांपासून वेगळे राहात होते. त्यानंतर आमचे आशिलांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे हे सतत दारु पिवून येणे, आमचे आशिलांस मारहाण करणे याप्रमाणे वागू लागले. आमचे आशिलांना पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांचेपासून विवाह संबंधातून झालेली मुलगी ही दोन महिन्यांची असताना आमचे आशिल हे त्यांचे माहेरी मौजे कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथे राहावयास आले तेव्हापासून ते आजपर्यंत आमचे आशिल हे माहेरीच राहात आहेत. आमचे आशिल या सासरी नांदत असताना आमचे आशिलांचे पती हे कोणताही कामधंदा करीत नसत. सतत दिवसभर दारु पित असे व झोपून राहात असे. त्यामुळे आमचे आशिल व त्यांचे मुलीवर उपासमारीची वेळ आली होती. आमचे आशिलांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांनी घरातील सर्व भांडीकुंडी देखील दारुच्या व्यसनापायी विकून टाकलेली आहेत.

आमचे आशिल या माहेरी आल्यापासून एकदाही त्यांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे हे आमचे आशिलास अगर मुलीला भेटण्यास आलेले नाहीत अगर आमचे आशिल व मुलीची साधी विचारपूस देखील केलेली नाही. त्यामुळे आमचे आशिलांना आता यापुढे त्यांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांचेबरोबर कोणताही वैवाहिक संबंध ठेवावयाचा नसून सदरहू विवाह बंधनातून मुक्त होण्याचे आमचे आशिलांनी ठरविलेले आहे. त्यामुळे आमचे आशिलांना त्यांचे पती श्री. सचिन नामदेव पाष्टे यांचेसोबतचे असलेले वैवाहिक संबंध संपुष्टात आणावयाचे असल्याने व त्यांना दुसरा घरोबा करावयाचा असल्याने आमचे आशिल सदरहू जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

तरी यापुढे आमचे आशिलांचा त्यांचे पती सचिन नामदेव पाष्टे, रा. मु. पो. मोरबावळे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांचेबरोबर असलेले वैवाहिक संबंध ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून संपुष्टात आणीत आहेत व वेगळा घरोबा करण्यास मुक्त आहेत असे प्रस्तुतचे जाहीर नोटीसीने जाहीर करीत आहेत.

सदरहू जाहीर नोटीस मुद्दामहून वैवाहिक संबंध संपुष्टात आणणेकामी प्रसिध्दी केली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस

दि. १४/०२/२०२६

सही/-
**श्री. विलास दत्तात्रय पवार**
**ॲडव्होकेट**

## ग्रामपंचायत पांगारे, ता. पुरंदर, जि. पुणे

### B1 पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२५/२६

ग्रामपंचायत पांगारे, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत पांगारे ता. पुरंदर जि.पुणे यांच्याकडुन दिनांक २५/०२/२०२६ ते दिनांक ०४/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक २५/०२/२०२६ ते दिनांक ०४/०३/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत गाळे सुधारणा करणे. | ३५४९९९/- | दिनांक २५/०२/२०२६ ते दिनांक ०४/०३/२०२६ | ५९०/- | ३५५०/- |
| २ | पांगारे जि.प. शाळा येथे शौचालय बांधणे. | २९९७८८/- | | २३६/- | २९९८/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत पांगारे ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५०००००३४ वर भरल्याची पावती/चलन दिल्यानंतर उपलब्ध होतील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत पांगारे ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५०००००३४ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत पांगारे यांनी राखुन ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी    प्रशासक**
**ग्रामपंचायत पांगारे, ता. पुरंदर, जि. पुणे**

# पुणे महानगरपालिका

## निविदा प्रकिया कक्ष

## निविदा जाहिरात - फेरनिविदा

विक्री कालावधी दिनांक :-२६/०२/२०२६ ते ०९/०३/२०२६ वेळ दुपारी १२:३० पर्यंत
स्विकृती दिनांक :-२६/०२/२०२६ ते ०९/०३/२०२६ वेळ दुपारी १२:३० पर्यंत
टेंडर उघडणे दिनांक:-१०/०३/२०२६ दुपारी ०१:०० वाजता

| अ. क्र. | टेंडर क्रमांक | विभागाचे नाव/ खात्याचे नाव | कामाचे नाव | खाते | निविदा संच/ किंमत/ शुल्क | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत दिवसामध्ये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तिचे नाव व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/358 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | पुणे महानगरपालिकेच्या हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत देवाची उरुळी कचरा प्रकल्प येथे प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणे. | विद्युत | 415 | 847449 | 8474 | 180 दिवस | "श्री.गिरीष धाबेवार 9518367460" |
| २ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/360 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | पुणे महानगरपालिकेच्या हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत देवाची उरुळी कचरा प्रकल्प परिसरात विद्युत विषयक व देखभाल दुरुस्तीची व इतर तदनुषंगिक कामे करणे. | विद्युत | 415 | 847385 | 8474 | 180 दिवस | "श्री.गिरीष धाबेवार 9518367460" |
| ३ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/361 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत न्याती चौक कोरीयंथन क्लब मागील बाजूस प्रकाश व्यवस्थेस सुधारणा करणे व इतर तदनुषंगिक काम करणे. | विद्युत | 415 | 762268 | 7623 | 180 दिवस | "श्री.गिरीष धाबेवार 9518367460" |
| ४ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/364 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | पुणे शहरातील प्रभाग क्र.२२ मधील क्रिश्चन दफनभूमी येथे सुधारणा कामे करणे. | भवन | 415 | 503744 | 5037 | 60 दिवस | श्री. ज्ञानेश्वर सोनवलकर 9665919571 |
| ५ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/365 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र.२२ मधील मनपा शाळेमध्ये मुलीसाठी स्वच्छतागृह बांधणे. | भवन | 415 | 677675 | 6777 | 60 दिवस | श्री. ज्ञानेश्वर सोनवलकर 9665919571 |
| ६ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/366 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | पुणे शहरातील प्रभाग क्र.२२ मधील मुस्लीम कब्रस्तान सुधारणा कामे करणे. | भवन | 415 | 673346 | 6733 | 60 दिवस | श्री.ज्ञानेश्वर सोनवलकर 9665919571 |
| ७ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/367 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र.२६ येथे ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423627 | 4236 | 60 दिवस | "श्री.प्रतिक दळवी 9588654508" |
| ८ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/368 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र.२६ येथे भवन दुरुस्ती विषयक कामे करणे. | भवन | 415 | 423339 | 4233 | 60 दिवस | "श्री.प्रतिक दळवी 9588654508" |
| ९ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/369 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र.२६ येथे रस्ते दुरुस्ती विषयक कामे करणे. | पथ | 415 | 420965 | 4210 | 60 दिवस | "श्री.प्रतिक दळवी 9588654508" |
| १० | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/370 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र.२६ येथील महंमदवाडी, कौसरबाग, हांडेवाडी रोड, सातवनगर, इंदिरानगर, सिद्धार्थनगर येथील ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 338738 | 3387 | 60 दिवस | "श्री.प्रतिक दळवी 9588654508" |
| ११ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/371 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत नव्याने समाविष्ट गावांमधील औताडेवाडी-हांडेवाडी येथे ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423613 | 4236 | 60 दिवस | श्रीमती अस्मिता कुटे 9371566616 |
| १२ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/372 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत नव्याने समाविष्ट गावांमधील होळकरवाडी येथे ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423693 | 4237 | 60 दिवस | "श्रीमती अस्मिता कुटे 9371566616" |
| १३ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/373 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत मोरे वस्ती, मांजरी बुद्रुक परिसरात ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423538 | 4235 | 60 दिवस | श्री.अनंत ठोक 7057961761 |
| १४ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/374 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत मांजरी बुद्रुक, महादेवनगर, शेवाळेवाडी परिसरात पथ दुरुस्ती विषयक कामे करणे. | पथ | 415 | 583029 | 5830 | 60 दिवस | श्री.अनंत ठोक 7057961761 |
| १५ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/375 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत महादेवनगर, गोपाळपट्टी परिसरात ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423536 | 4235 | 60 दिवस | श्री.अनंत ठोक 7057961761 |
| १६ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/376 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत मांजरी बुद्रुक, परिसरात ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423709 | 4237 | 60 दिवस | श्री.अनंत ठोक 7057961761 |
| १७ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/377 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत शेवाळवाडी, परिसरात ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423711 | 4237 | 60 दिवस | श्री.अनंत ठोक 7057961761 |
| १८ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/378 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत ससाणेनगर, हडपसर गावठाण, गोंधळेनगर, सातववाडी, काळेपडळ परिसरात ब्लॉक दुरुस्ती विषयक कामे करणे. | पथ | 415 | 334340 | 3343 | 60 दिवस | श्री.सोमनाथ वासकर 9049271091 |
| १९ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/379 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत ससाणेनगर, हडपसर गावठाण, गोंधळेनगर, सातववाडी, काळेपडळ परिसरात रस्ते दुरुस्ती विषयक कामे करणे. | पथ | 415 | 313026 | 3130 | 60 दिवस | श्री.सोमनाथ वासकर 9049271091 |
| २० | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/380 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालयमध्ये भवन दुरुस्ती विषयक कामे करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | भवन | 415 | 169491 | 1695 | 60 दिवस | श्री.सोमनाथ वासकर 9049271091 |
| २१ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/381 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत ससाणेनगर, हडपसर गावठाण, गोंधळेनगर, सातववाडी, काळेपडळ परिसरात ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 423551 | 4236 | 60 दिवस | श्री.सोमनाथ वासकर 9049271091 |
| २२ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/382 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत नव्याने समाविष्ट गावांमधील साडेसतरानळी परिसरातील रस्ते, ब्लॉक दुरुस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 420895 | 4209 | 60 दिवस | श्री.सोमनाथ वासकर 9049271091 |
| २३ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/383 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत नव्याने समाविष्ठ गावांमधील साडेसतरानळी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन साफ करणे व चेंबर दुरुस्ती विषयक कामे करणे. | ड्रेनेज | 415 | 420602 | 4206 | 60 दिवस | श्री.सोमनाथ वासकर 9049271091 |
| २४ | PMC/ZONE-4/ HADAPSAR /2025/ Recall-334 | हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | उपआयुक्त परिमंडळ क्र.४ अंतर्गत हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालय येथे वृक्ष छाटणीसाठी व संवर्धन विषयक काम करणेकरिता कंत्राटी पद्धतीने कुशल व अकुशल मजूर पुरविणे. | उद्यान विभाग | 415 | 999246 | 9992 | 360 दिवस | श्री.ज्ञानेश्वर सोनवलकर 9665919571 |
| २५ | PMC/ZONE-4/ YEWALEWADI 2025 -220 recall | कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३८ शेलारमळा परिसरात पावसाळी लाईन टाकणे. | पथ | 415 | 415868 | 4159 | 120 दिवस | श्रीमती बिराजदार 7447431225 |
| २६ | PMC/ZONE-4/ WANAWADI /2025/5 EX | वानवडी-रामटेकडी कार्यालय | पुणे मनपाच्या वानवडी येथील इ लर्निंग शाळा येथे बसविण्यात येणाऱ्या नवीन लिफ्टच्या अनुषंगाने इतर विद्युत विषयक कामे करणे. (G+4 स्टोप्स) (रजिस्ट्रेशन अट शिथिल) | विद्युत | 415 | 423055 | 4231 | 90 दिवस | संगीता ढगे 9689931104 |

### अटी व शर्ती

१) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून (प्रत्येक कामासाठी पूर्व पात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करुन घ्यावयाची आहेत आणि निवेदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती वर ठेकेदाराने स्वाक्षरी करून अ पाकीट अपलोड करावयाचे आहे.
२) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतच्या सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
३) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
४) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.) / ३२ दिनांक २२/४/२०१६ नुसार बयाना रक्कम ई.सी.एस./आर.टी.जी.एस./न.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहेत.
५) अतिरिक्त सुरक्षाठेव DD द्वारे सादर करणे अनिवार्य होते. तथापि यापुढे सदर अतिरिक्त सुरक्षाठेव रक्कम (APSD) ची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या DD/FDR/BG स्वरुपात स्वीकारण्यात येणार आहे.

**सही / -**
**उप आयुक्त**
**परिमंडळ क्रमांक ४**
**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात क्र. ५६-डीसी-४-२०२६ दिनांक : २४/०२/२०२६**

# अभ्यास दौऱ्यातून परिणामाभिमुख, शाश्वत व पारदर्शक शासनव्यवस्थेचा निर्धार : आ. अमित गोरखे

## आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यातून आ. अमित गोरखे यांचा 'शाश्वत आणि पारदर्शक' पिंपरी-चिंचवडचा संकल्प!

**पिंपरी (दै. संध्या) :**

महाराष्ट्राच्या प्रशासन, कृषी, पर्यावरण व संसदीय कार्यपद्धती अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आमदार अमित गोरखे यांच्यासह महाराष्ट्रातील १५ आमदारांनी १७ ते २१ मार्च या कालावधीत लंडन व वेल्स येथे पाच दिवसीय अधिकृत अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण केला. 'युनिव्हर्सिटी ऑफ वेल्स ट्रिनिटी सेंट डेव्हिड' यांच्या वतीने आयोजित या अभ्यासक्रमात जागतिक नेतृत्व, पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती, शाश्वत कृषी व्यवस्थापन व संसदीय लोकशाही प्रणालीचा सखोल अभ्यास करण्यात आला.


दौऱ्याबाबत माहिती देताना आमदार अमित गोरखे म्हणाले, शासन व्यवस्थेत केवळ धोरणे जाहीर करणे पुरेसे नाही, तर त्या धोरणांचे प्रत्यक्ष परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत. इम्पॅक्ट असेसमेंट, डिजिटल मॉनिटरिंग व उत्तरदायित्व हीच आधुनिक प्रशासनाची खरी ओळख आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक शहरात डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया आणि कार्यक्षम अंमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक योजनेचा खर्च-लाभ विश्लेषण (कॉस्ट-बेनिफिट अनालिसिस) व परिणाममापन प्रणाली विकसित केल्याशिवाय प्रशासन प्रभावी ठरणार नाही. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये 'कार्यक्षमता डॅशबोर्ड', विभागनिहाय मुख्य कार्यक्षमता निर्देशांक (KPIs) आणि नागरिकांना खुली माहिती प्रणाली विकसित करण्याचा माझा प्रयत्न राहील. वेल्समधील अनुभवाबाबत बोलताना आमदार अमित गोरखे यांनी वेळेच्या नियोजनावर (टाईम मॅनेजमेंट) विशेष भर दिला. त्यांनी म्हटलंय की, वेल्समधील लोकांची वेळेप्रती असलेली शिस्त कडक आहे. ही वक्तशीरपणाची संस्कृती त्यांच्या प्रगतीचा मुख्य आधार असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कामकाजातही अशीच शिस्त आणि उत्तरदायित्व आणण्याचा माझा प्रयत्न राहील.

वेल्स देश कचरा व्यवस्थापनात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. यावर भाष्य करताना आमदार गोरखे म्हणाले, तिथली अत्याधुनिक पुनर्प्रक्रिया (रिसायकलिंग) पद्धत आणि कचऱ्याचे संसाधनात रूपांतर करण्याची कला आदर्श आहे. तसेच, पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्यासाठी तिथे राबवली जाणारी 'चक्रीय जल अर्थव्यवस्था' (सर्क्युलर वॉटर इकॉनॉमी) थक्क करणारी आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान आपण पिंपरी-चिंचवडमध्ये राबवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलणार आहोत. दौऱ्याच्या तिसऱ्या दिवशी लंडनमधील महाराष्ट्र मंडळाने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या सोहळ्यात आमदार अमित गोरखे उत्साहाने सहभागी झाले. यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे 'रयतेचे राज्य' हे सुशासन आणि पारदर्शकतेचे जागतिक स्तरावरील सर्वात आदर्श उदाहरण आहे. तीच शिवकालीन सुशासनाची मूल्ये आधुनिक प्रशासनात आणि लोकशाहीत राबवण्याचा संकल्प या निमित्ताने केला आहे. अतिशय गौरवपूर्ण आणि उत्साही वातावरणात सातासमुद्रापार ही शिवजयंती साजरी करण्यात आली.

लंडनचे पार्लमेंट (पॅलेस ऑफ वेस्टमिन्स्टर) हे इ.स. १७०० च्या सुमारास साकारले गेले असून, याच महान वास्तूची आणि तिथल्या लोकशाही प्रक्रियेची प्रतिकृती आपल्या भारतीय संसदेच्या रचनेत दिसून येते. ऐतिहासिकदृष्ट्या याच काळात ब्रिटनला वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी पहिला तरुण पंतप्रधान लाभला होता; हे युवा नेतृत्वाच्या संधींचे उत्तम उदाहरण असल्याचे आमदार गोरखे यांनी नमूद केले. वेल्समध्ये तरुणांना वयाच्या १६ व्या वर्षीच मतदानाचे आणि निवडणूक लढविण्याचे अधिकार आहेत, जे युवा सक्षमीकरणाच्या दृष्टीने क्रांतीकारक आहे.

### शाश्वत कृषी आणि पर्यावरणपूरक विकास

हवामान बदल ही गंभीर समस्या असल्याचे सांगत आमदार अमित गोरखे यांनी 'क्लायमेट-रेझिलियंट' पिके आणि अचूक शेती यावर भर दिला. 'सेंटर फॉर अल्टरनेटिव्ह टेक्नॉलॉजी' येथील भेटीनंतर त्यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये सौरऊर्जा प्रकल्प, ई-वाहन चार्जिंग नेटवर्क आणि शून्य-कार्बन (झिरो-कार्बन) तंत्रज्ञानाचा पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही दिली. पाच दिवसांचा सखोल आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर, सर्व सहभागी सदस्यांसाठी विशेष प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. 'कॉमनवेल्थ पार्लिमेंटरी असोसिएशन' (CPA) चे उपसचिव जार्विस मतिया यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष प्रा. राम शिंदे व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार अमित गोरखे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी 'कॉमनवेल्थ लीडरशिप इन्स्टिट्यूट'चे अध्यक्ष डॉ. जोनाथन ग्रे, 'UWTSD'चे इयान बॅसेट आणि डीन प्रो. जेरेमी स्मिथ यांसारख्या आंतरराष्ट्रीय मान्यवरांची उपस्थिती होती.



### लोकशाही सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय

दौऱ्याच्या शेवटी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक निवासस्थानास (१० किंग हेन्री रोड) भेट दिल्यानंतर आमदार गोरखे म्हणाले, सामाजिक न्याय, समता आणि बंधुता हीच आमच्या राज्यकारभाराची दिशा आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये वंचित घटकांसाठी कौशल्य विकास आणि संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी अधिक बळकट करण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुशासन तत्त्वांचा आदर्श आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानिक विचारांचा मार्ग स्वीकारून, लोककेंद्रित आणि शाश्वत शासन उभारण्याचा माझा संकल्प आहे, असं देखील आमदार अमित गोरखे यांनी प्रतिपादन केलं आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मोरवाडी चौकात 'ग्रेट सेपरेटर'मध्ये कंटेनर अडकल्याने मोठी वाहतूक कोंडी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी चौक परिसरात मंगळवारी (दि.२४) सकाळी 'ग्रेट सेपरेटर'मध्ये एक कंटेनर अडकल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. सकाळच्या गर्दीच्या वेळी ही घटना घडल्याने नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. मिळालेल्या माहितीनुसार, उंची मर्यादेपेक्षा जास्त असलेला कंटेनर ग्रेड सेपरेटरखाली जात असताना अडकला. त्यामुळे मोरवाडी चौकातून नाशिक फाटा तसेच चिंचवड गावकडे जाणारी वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली. काही मिनिटांतच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि परिसरात वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या सहाय्याने अडकलेला कंटेनर बाजूला काढण्याचे काम हाती घेण्यात आले. दरम्यान, पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात आली; मात्र कोंडी पूर्णपणे सुटण्यास सुमारे एक ते दीड तास लागल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या घटनेमुळे 'ग्रेट सेपरेटर'खालील उंची मर्यादा आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित विभागाने उंचीबाबत स्पष्ट सूचना फलक लावावेत तसेच सकाळ-सायंकाळच्या गर्दीच्या वेळी अवजड वाहनांवर निर्बंध आणावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, या प्रकारामुळे शहरातील वाहतूक नियोजनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### सोसायटीत कचरा टाकण्यावरून वाद, एकाला बेदम मारहाण



पिंपरी (दैनिक संध्या) : सोसायटीच्या 'ड्राइव्ह वे' मध्ये कचरा टाकू नका असे सांगितल्याच्या रागातून दोन जणांनी एका रहिवाशाला बेदम मारहाण केली. ही घटना गुरुवार (दि.१२) रात्री साडेनऊच्या सुमारास यशदा सुप्रीम सोसायटी, डुडुळगाव येथे घडली. याबाबत अक्षय अरुण मोरे (३४, रा. डुडुळगाव. मूळ – तणपुरवाडी, पाथर्डी, अहिल्यानगर) यांनी दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, दिलीप वाढेकर (रा. डुडुळगाव) आणि त्यांचा मुलगा शुभम दिलीप वाढेकर (रा. डुडुळगाव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे सोसायटीतील कचऱ्याच्या डब्यातील कचरा 'ड्राइव्ह वे' मध्ये फेकत होते. फिर्यादीने त्यांना तसे न करण्याबाबत हटकले असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत खांद्यावर, पाठीत आणि हातावर मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या उजव्या हाताचे बोट फॅक्चर झाले आहे. दिघी पोलिस तपास करत आहेत.

### महापालिकेच्या स्थायी समिती सभापतींची निवड 28 फेब्रुवारीला होणार



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी विशेष सभा शनिवार, दि.२८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही सभा महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात होणार आहे. या सभेत स्थायी समितीच्या सभापती पदासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २१(१) नुसार निवड करण्यात येणार आहे. संबंधित नियमांनुसार ही निवड प्रक्रिया पार पडणार आहे. यावेळी पीठासीन अधिकारी श्रीमती पवनीत कौर अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका या असणार आहेत. स्थायी समितीत भाजपचे वर्चस्व आहे. अभिषेक बारणे, शालिनी गुजर, मनिषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, शीतल वर्णीकर, कृष्णा सुरकुले, अर्चना कारंडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन हे भाजपाचे ११ सदस्य आहेत. सभापती पदाचे संदीप कस्पटे आणि अभिषेक बारणे, बाबासाहेब त्रिभुवन हे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. आता पक्षश्रेष्ठी या तीन जणांपैकी कोणाला संधी देणार की धक्कातंत्र देत आणखी कोणाच्या गळ्यात सभापती पदाची माळ टाकणार हे पाहणं उत्सुकतेचे ठरणार आहे.

## बोरघाटात प्रोपिलीन गॅस टँकरचा ब्रेक निकामी

**लोणावळा (दै. संध्या) :**

■ अमृतांजन पूल परिसरातील घटना; स्फोटाचा धोका टळला, वाहतूक काही काळ ठप्प

खंडाळा बोरघाटातील अमृतांजन पूल परिसरात सोमवारी (दि. 23) सकाळी सुमोर दहा वाजता कोचीहून गुजरातकडे 21 टन क्षमतेचा प्रोपिलीन गॅस वाहून नेणाऱ्या टँकरचा (एनएल 01 एएफ 5040) अचानक बेक निकामी झाला. समोर धोकादायक वळणे आणि खोल दरी असल्याने मोठा अनर्थ ओढवण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, चालकाने प्रसंगावधान राखत टँकर रस्त्याच्याकडेला असलेल्या आरसीसी रिटेनिंग वॉलला जाणीवपूर्वक धडक दिली. त्यामुळे टँकर जागीच थांबला आणि संभाव्य स्फोट अथवा गॅसगळतीसारखी गंभीर दुर्घटना टळली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलिस बोरघाट, आयआरबीची पेट्रोलिंग टीम, देवदूत यंत्रणेची अग्निशमन दल, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान तसेच हेल्प फाउंडेशनची आपत्कालीन टीम घटनास्थळी दाखल झाली.

### मोकळ्या जागेत हलविण्यात आला टँकर

क्रेन आणि पुलरच्या सहाय्याने टँकर अपघातस्थळापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील मोकळ्या जागेत सुरक्षितपणे हलविण्यात आला. खोपोली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन हिरे आणि महामार्ग वाहतूक पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडली. आरटीओ अधिकारी रावते यांनी वाहनाची तांत्रिक तपासणी केली असून, खोपोली पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

## गाळा मिळालेल्या बचत गटांना करण्यात येणार गाळा वाटप पत्र

**पिंपरी (दै. संध्या) :**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महिला बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्ये विकसित करणे तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरा आणि शहरी संस्कृतीचे जतन करणे या उद्देशाने दरवर्षी पवनाथडी जत्रा आयोजित करण्यात येते .यावर्षी पवनाथडी जत्रा दिनांक २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत सांगवी पी.डब्ल्यू.डी. मैदान येथे आयोजित करण्यात आली आहे.पवनाथडी जत्रा ही महिला बचत गटांसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरली आहे.

पवनाथडी जत्रेत सहभागासाठी अर्ज वाटप व स्वीकृती दिनांक १० फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत करण्यात आली. महिला बचत गटांकडून खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झाले आहेत. जनरल प्रवर्ग – ५११, व्हेज प्रवर्ग – ३७३, नॉनव्हेज प्रवर्ग – २१०. तसेच दिव्यांग राखीव प्रवर्ग यामध्ये ५ , तृतीयपंथी प्रवर्ग – ३ असे अर्ज प्राप्त झाले आहेत.

लकी ड्रॉ पद्धतीने गाळे वाटप २२ फेब्रुवारी रोजी मा. मधुकरराव पवळे सभागृह, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे करण्यात आले असून सोडती नुसार जनरल प्रवर्गासाठी ४०५, व्हेज प्रवर्गासाठी १७२, नॉन व्हेज प्रवर्गातील १३५ बचत गटांना गाळे देण्यात येणार आहेत.

ज्या बचत गटांना सोडतीमध्ये स्टॉल मिळालेले आहेत, त्या स्टॉलसाठीचे अलोटमेंट लेटर वाटप उद्या मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी पी.डब्लु. डी.ग्राउंड, जुनी सांगवी येथे सकाळी ११.३० पासून करण्यात येणार आहे.

सोडतीमध्ये स्टॉल मिळालेल्या बचत गटांची यादी समाज विकास विभाग माहिती केंद्र येथे लावण्यात आली असून ज्या बचत गटांना स्टॉल मिळालेले आहेत, त्या सर्वांना त्याबाबतचे एसएमएस देखील मोबाईलवर पाठवण्यात आलेले आहेत. ज्या बचत गटातील महिला गाळा वाटप पत्र घेण्यासाठी येणार आहे, त्यांनी सोबत येताना आधार कार्डची झेरॉक्स, एक पासपोर्ट साईज फोटो आणि बँक पासबुक घेऊन यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

तरी ज्या महिलांना सोडतीमध्ये गाळा मिळालेला आहे त्या महिला बचत गटांनी उद्या साडेअकरा वाजता आवश्यक कागदपत्रासह उपस्थित रहावे असे आवाहन समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे यांनी केले आहे.

## पिंपरीत वसंताची चाहूल; लाल-केशरी फुलांनी शहर बहरले

### पळस, बोगनवेल, झेंडूसह विविध फुलांनी दिली वसंताच्या आगमनाची वर्दी

**पिंपरी (दै. संध्या) :**

वसंत ऋतूला सुरुवात होताच निसर्गात नवचैतन्य संचारत असल्याचे दिसून येते. पाने, फुले झडून निष्पर्ण झालेली झाडे आता बहरताना दिसून येतात. वसंतऋतू सुरू होताच लाल केशरी रंगाचा शालू पांघरुन बोगनवेलच्या फुलांना बहर येतो. लाल पिवळ्या रंगाच्या फुलांची उधळण करीत रस्त्यावर कंपाऊंडच्या तारेवर रखरखत्या उन्हात गोकर्ण, सूर्यफूल, झेंडू, सदाबहार (पेरिविंकल), झिनिया आणि जास्वंद या लाल- पांढरी- पिवळी फुलं वसंतऋतू बहरल्याची साक्ष देत आहेत. पिंपरी शहर व उपनगरांत रस्त्यावर आणि पिंपरी शहरातील सार्वजनिक टेकड्या अन् उद्यानांत हे दृष्य दिसत आहे. उन्हात कोरड्या वातावरणामध्ये झेंडू, सदाबहार (पेरीविंकल), बोगनवेल, झिनिया हे फुले टवटवीत दिसतात. मराठी दिनदर्शकाच्यिा मते आपल्याकडे वसंतऋतू गुढी पाडव्यापासून सुरू असतो, असे मानले जाते. दरवर्षी गुढीपाडवा मार्चच्या तिसऱ्या किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात येतो. तिथपासून मे अखेरपर्यंत वसंत ऋतू मानला जातो. गुढी पाडवा हा सण मार्च महिन्यात असतो. त्यामुळे त्या दिवसापासून माहे (20 मे) पर्यंत वसंत ऋतूची कालगणना केली जाते. मात्र, शहरात भूगोल विषयातील तज्ज्ञ गणेश सुवासे यांच्या मते खरा वसंत हा फेबुवारी ते एप्रिल या कालावधीतच असतो. कारण याच कालावधीत पिंपरी शहरासह इतर ठिकाणी वसंत ऋतूमध्ये फुलणाऱ्या वनस्पतीच या ऋतूचे खरे साक्षीदार आहेत. याच कालावधीत निसर्गात जी झाडे फुलतात ती प्रसन्न वसंताची वर्दी देतात.

### वसंतात फुलतात ही झाडे

वसंतात पळस, सोनसावर, पांगारा, अशोक, कांचन, काटेसावर, गेळा, धावडा, फणशी, बेल, महाधावडा, मेडशिंगी ही झाडे फुलतात. पळसाची लाल केशरी रंगीची फुले आपल्याला वसंताच्या आगमनाची वर्दी फेबुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच देतात. तसेच, बेलाचे झाड जानेवारीपर्यंत शुष्क कोरडे झालेले असते, मात्र फेबुवारी ते एप्रिलदरम्यान त्याला नवी पालवी येते. ही कोवळी पानेही वसंताच्या आगमनाची चाहूल देतात.

## मावळात ७३ ग्रामपंचायतींवर प्रशासकीय कारभार; सरपंचच असणार प्रशासक

**वडगाव मावळ (दै. संध्या) :**

■ कालावधी संपलेल्या व संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर शासन निर्णय; मे महिन्यात निवडणुकांची शक्यता

मावळ तालुक्यातील एकूण 103 ग्रामपंचायतींपैकी 16 ग्रामपंचायतींवर यापूर्वीच कालावधी संपल्याने प्रशासक नियुक्त करण्यात आले असून, फेबुवारीअखेरपर्यंत मुदत संपणाऱ्या 57 ग्रामपंचायतींवर आता शासन निर्णयानुसार सरपंच प्रशासक म्हणून नियुक्त होणार आहेत. त्यामुळे तालुक्यातील तब्बल 73 ग्रामपंचायतींवर आता प्रशासकीय कारभार असणार आहे. तसेच, या सर्वच ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचीही तयारी सुरू झाली आहे. तालुक्यातील तुंग, करूंज, कडधे, डोगरगाव, ठाकुरसाई, पुसाणे, शिळाटणे, वराळे, नाणेली तर्फे चाकण, टाकवे खु, औढे खु, ओझर्डे, केवरे, काले या ग्रामपंचायतींची मुदत दीड ते दोन वर्षापूर्वी संपली आहे. तर, कान्हे व जाभूळ या ग्रामपंचायतीची मुदत एक वर्षापूर्वी संपली आहे. संबंधित 16 ग्रामपंचायतींवर कालावधी संपल्यावर लगेचच शासकीय प्रकाशक नेमण्यात आले असून, एक ते दोन वर्षापासून प्रशासकीय कारभार सुरू आहे.

## भगवद्गीता जीवन जगण्याचा मार्गदर्शक पथ – शंकर गायकर

**पिंपरी (दै. संध्या) :**



'भगवद्गीता हा केवळ एक ग्रंथ नसून तो मानवी जीवन जगण्याचा मार्गदर्शक पथ आहे!' असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री तथा राष्ट्रीय प्रवक्ते शंकर गायकर यांनी महासाधू मोरया गोसावी क्रीडासंकुल, चिंचवडगाव येथे रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी केले. विश्व हिंदू परिषद व बजरंग दल – पिंपरी चिंचवड यांच्या वतीने आयोजित हिंदू स्वाभिमान मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून शंकर गायकर बोलत होते. यावेळी इस्कॉन मंदिर, रावेतचे प्रमुख गोपती दास, विश्व हिंदू परिषद प्रांतमंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, नितीन वाटकर, प्रांत उपाध्यक्षा माधवी सौंशी, परेश पटेल यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती; तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मैदानात उपस्थिती होती.

शंकर गायकर पुढे म्हणाले की, 'अर्जुन नैराश्यात गेल्यावर भगवान श्रीकृष्णाने गीतेच्या माध्यमातून केलेला उपदेश हा मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त आहे. गीताविरहित भारत ही कल्पनादेखील आपण करू शकत नाही. जोपर्यंत चंद्र – सूर्य अस्तित्वात आहेत, तोपर्यंत भगवद्गीता भारतात राहील. छत्रपती शिवाजीमहाराज, छत्रपती संभाजीमहाराज, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यासह सर्व क्रांतिकारकांना लढण्याची प्रेरणा भगवद्गीतेने दिली आहे. 'मराठा' हा शब्द शौर्याचे प्रतीक आहे. तसेच देशासाठी सर्वस्व समर्पित करणारे दल म्हणजे बजरंग दल होय!' गायकर यांनी आपल्या विस्तृत व्याख्यानातून संभाजीमहाराज, सावरकर आणि रामप्रसाद बिस्मिल यांचा इतिहास कथन केला.

गोपती दास यांनी, 'विश्व हिंदू परिषद जगातील अनेक देशात कार्यरत असून इस्कॉन सुमारे १३० देशांमध्ये धर्मरक्षणाचे कार्य करीत आहे. असंख्य साधूसंत आणि देशभक्त यांनी आपल्या बलिदानातून धर्म टिकवला आहे. त्यामुळे तो वृद्धिंगत करण्याची आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे!' असे आवाहन केले. यावेळी बजरंग दलाची माहिती नितीन महाजन, मातृशक्ती आयामाची माहिती प्रिया रसाळ, दुर्गा वाहिनीची माहिती सोनाली नाथ, सेवा विभागाची माहिती डॉ. शर्वरी एरगट्टीकर, धर्मप्रसार आयामाची माहिती ॲड. मृणालिनी पडवळ, विधी प्रकोष्टची माहिती ॲड. संकेत राव यांनी दिली.

तर किशोर चव्हाण यांनी विश्व हिंदू परिषदेची स्थापना, उद्देश व भूमिका विशद केली.

जिल्हा मंत्री धनंजय गावडे यांनी मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. संभाजी बालघरे, नवनाथ साकोरे , किरण शिंदे, तेजस्विनी डोमसे, मधुसूदन जैन, अरविंद लंघे, पन्नालाल जाधव, कौशल रावळ यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. परेश पटेल यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वाल्हे परिसरात चिंच झोडपणीला सुरुवात

वाल्हे (दैनिक संध्या) : वाल्हे (ता.पुरंदर) परिसरात हंगामानुसार चिंच झोडपणीच्या कामास सुरूवात करण्यात आली असून या कामामुळे परिसरातील महिला मजुरांना जवळपास चार महिने रोजगार उपलब्ध होणार असल्याचे चित्र स्पष्ट आहे. गतवर्षी समाधानकारक पाऊस पडल्याने यंदा वाल्हे परिसरातील चिंचेच्या झाडांना चांगल्याप्रकारे मोहर येऊन फळधारणा देखील मोठ्या प्रमाणात झाली आहे .त्यामुळे चिंचेची झाडे खरेदी करून व्यापारी वर्गाकडून चिंच झोडपणीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. चिंचे पासून साधारणपणे ५५ टक्के गर १४ टक्के चिंचोके तर ११ टक्के टरफल व फळातील शिरांचे उत्पन्न मिळत असल्याने व्यापारी वर्गाकडून ग्रामीण भागातील महिलांना घरपोच चिंच फोडणीसाठी दिली जात आहे. त्यामुळे अनेक महिला घरातील कामे करीत घरबसल्या चिंच फोडणी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत. एक महिला दिवसांतून २० ते ४० किलो चिंच फोडणी करते. त्यामुळे त्यांना २०० ते ४०० रुपये पर्यंत रोजंदारी मिळत असून चिंचा झोडपण्याचे काम फेब्रुवारी ते मे महिन्यापर्यंत सुरू असल्याने या चार महिन्यांत येथील महिलांना घरबसल्या रोजगार निर्मिती होणार असल्याचे मत चिंचेचे व्यापारी अहमद मुजावर यांनी सांगितले.



### सार्वजनिक बांधकाम विभागाचा ढिसाळ कारभार; रस्ते बनले मृत्यूचे सापळे

चाकण (दैनिक संध्या) : वाहतूक कोंडी, कचरा समस्या, जनावरांनाही चालताना लाज वाटेल असे झालेले रस्ते, विजेचा सुरू असलेला लपंडाव त्यात चाकण नगरपरिषद हद्दीतील वाड्यावस्त्यांवरील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे मृत्यूचे सापळे बनले आहेत. चाकण नगरपरिषद हद्दीतील राक्षेवाडी रस्त्यावरील ड्रेनेजचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सध्या चालू आहे. अद्याप पर्यंत ड्रेनेजला झाकणे लावलेली नाहीत. हे काम नगरपरिषदेचे नसून सार्वजनिक बांधकाम विभागाचे असल्याचे नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा श्यामराव राक्षे यांनी सांगितले. ड्रेनेजला झाकणे नसल्याने पादचारी व दुचाकी चालक त्यात पडून छोटे-मोठे अपघात झाले आहेत. गेली दोन महिने झाले वारंवार सांगून देखील संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी कसलीच दखल घेत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अजिंक्य शिंदे, पवार व ठेकेदार गोते हे कामात हलगर्जीपणा दाखवत आहेत. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी केली आहे.दोन दिवसांपूर्वी संबंधित ठेकेदाराला हे काम मार्गी लावण्याची सूचना चाकण नगरपरिषदेचे गटनेते नितीन गोरे, नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी दिली होती. मात्र डोळ्यावर कातडी ओढलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे काम पूर्ण केले नाही. धक्कादायक म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना फोन केला तर ते फोन न उचलता संपर्क होऊ देत नाहीत.

### विंग: शिंदेवाडी बिबट्याचा वयोवृद्धावर हल्ल्याचा प्रयत्न

विंग (दैनिक संध्या) : परिसरात बिबट्याची दहशत कायम असून, शिंदेवाडी (ता. कऱ्हाड) येथे एका वृद्धावर बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. काल पहाटे तीनच्या सुमारास भरवस्तीत घडलेल्या घटनेत बबन मारुती मुळगावकर (वय ८०) सुदैवाने बचावले. पहाटे ते लघुशंकेसाठी उठले होते. पत्नी मंगल यांनी आरडाओरडा करून बिबट्याला हुसकावल्याने मोठा अनर्थ टळला. शिंदेवाडी गाव व परिसरात बिबट्याचे वास्तव कायम आहे. शिवारात ग्रामस्थांना त्याचे वारंवार दर्शन घडत आहे. पाळीव प्राण्यावर हल्ल्याचे सत्र त्याच्याकडून वारंवार सुरूच आहे. दोनच दिवसांपूर्वी एका मोकाट श्वानाचा फडशा त्याने पाडला. दरम्यान, काल पहाटे तो भरवस्तीत घुसला. त्याने एका वृद्धावर हल्ल्याचा प्रयत्न केला. बिबट्याने कुंपणावरून उडी मारली. ती मुळगावकर यांच्या जवळ पडली. आवाजाने जागे झालेल्या पत्नी मंगल यांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने तेथून धूम ठोकली. या घटनेने ग्रामस्थांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाव व परिसरात बिबट्याच्या हल्ल्याची चर्चा ग्रामस्थांत रंगली. त्यामुळे दहशत निर्माण झाली आहे.

### सायकल स्पर्धेसाठी चकाचक केलेले रस्ते महिन्याभरात खचले; निकृष्ट दर्जाचं काम

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महापालिकेने आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी तब्बल १४५ कोटी रुपये खर्च करून रस्ते डांबरीकरण, चेंबर समपातळीत आणण्याचे काम केले, पण आता एक महिना पूर्ण होत असतानाच चेंबर खचायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे एवढा मोठा खर्च करून ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने पुन्हा दुरुस्तीची नामुष्की ओढवली आहे. महापालिका प्रशासन हे चेंबर पुन्हा दुरुस्त करणार असले तरी ठेकेदाराच्या चौकशीला मात्र टाळाटाळ केली जात आहे. पुण्यात जानेवारी महिन्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धा झाली. या स्पर्धेला पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे या स्पर्धेसाठी महापालिकेने ७५ किलोमीटरचे रस्ते चकाचक केले. रस्त्यातील ओबडधोबड पॅचवर्क गायब झाले, रस्त्यांवर पांढरे पट्टे, झेब्रा क्रॉसिंग, रंगवलेले पादचारी मार्ग आणि दुभाजकांमुळे रस्ते सुंदर झाले. प्रवासातील त्रास दूर झाल्याने पुणेकरांनी महापालिकेच्या या कामाचे कौतुक केले. महापालिकेने ७५ किलोमीटरच्या कामासाठी तब्बल १४५ कोटी रुपये मोजले आहेत.

# संतोष जगताप यांची भाजपा एनजीओ आघाडी जिल्हा संयोजकपदी नियुक्ती

## पुणे जिल्ह्यात सामाजिक कार्याला नवे बळ



**पुणे (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील युवा व धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते संतोष जगताप यांची भाजपा पुणे जिल्हा ग्रामीण या कार्यकारणी मध्ये एनजीओ आघाडीच्या जिल्हा संयोजक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे यांनी त्यांना याबाबतचे नियुक्तीपत्र दिले आहे. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश जगताप, सासवड शहराध्यक्ष आनंद जगताप, साकेत जगताप, भानुकाका जगताप, माधव शिवरकर, सचिन पठारे उपस्थित होते. संतोष जगताप हे सासवड येथील स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून गेले १७ वर्ष सातत्याने ते शैक्षणिक आणि समाजकार्यात सक्रिय आहेत. ग्रामीण व शहरी भागातील गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रतिष्ठानच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, सायकल वाटप, फिरती सायन्स लॅब, संगणक संचाचे वाटप,आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण मोहिम, महिला सक्षमीकरण कार्यक्रम, युवकांना मार्गदर्शन शिबिरे तसेच आपत्तीग्रस्तांना मदत अशा अनेक समाजोपयोगी उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे.

कोरोना काळातही त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अन्नधान्य वाटप, औषधोपचार सहाय्य व गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या सातत्यपूर्ण, निस्वार्थी आणि लोकाभिमुख कार्याची दखल घेत भाजपाकडून त्यांच्यावर पुणे जिल्हाग्रामीण एनजीओ आघाडीच्या जिल्हा संयोजक पदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना संतोष जगताप म्हणाले, "आजवर सामाजिक क्षेत्रात काम करताना सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास आणि सहकार्य लाभले. आता पक्षाच्या माध्यमातून जिल्हाभरातील विविध स्वयंसेवी संस्थांना एकत्रित करून अधिक व्यापक स्तरावर समाजहिताचे उपक्रम राबवण्याचा मानस आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पर्यावरण आणि युवक सक्षमीकरण या क्षेत्रांना विशेष प्राधान्य दिले जाईल."

तसेच त्यांनी पुढे सांगितले की, "पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सामाजिक उपक्रम पोहोचवणे, स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय वाढवणे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे उद्दिष्ट राहील."

त्यांच्या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील विविध राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. संतोष जगताप यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्ह्यात सामाजिक कार्य अधिक गतिमान व प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# चाकण एमआयडीसीत विकास कामांचा बट्ट्याबोळ



**चाकण (दै. संध्या)**

## सांडपाणी व कचऱ्यामुळे वाढलाय बकालपणा

विकास कामांच्या नावाखाली विविध प्रकल्पांचा दट्ट्या खेड तालुक्याच्या वाट्याला आला असताना प्रत्यक्षात मात्र चाकण एमआयडीसीत विकास कामांचा बट्ट्याबोळ झाला आहे. रस्त्यालगत साचलेले सांडपाणी आणि कचऱ्यामुळे सुटलेली दुर्गंधी यामुळे उद्योग नगरीत बकालपणा वाढत चालला आहे.

औद्योगिक वसाहतीमुळे चाकण शहराचे नाव जगाच्या नकाशावर झळकत असताना प्रत्यक्षात मात्र चाकण एमआयडीसीत पायाभूत सुविधा कोलमडल्या आहेत. चाकण आणि परिसरातील औद्योगिक वसाहतीत कचरा व्यवस्थापनाचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. स्थानिक रहिवासी व उद्योग, कंपन्यांचा फटका चाकण औद्योगिक वसाहतीला बसत आहे. उद्योगनगरीत निर्माण होणारा घनकचरा, रासायनिक कचरा, प्लॅस्टिक कचरा, आणि इतर कचऱ्याचे नियोजन झालेली नाही. विविध गावातील नागरिक कचरा अगदी मुख्य मार्गावर, चाकण तळेगाव चौक तसेच चाकण शिक्रापूर मार्गावर फेकून देतात.

चाकण लगतच्या कोणत्याही रस्त्यावर, वाड्या वस्त्यांवर रस्त्याने ये जा करणारे नागरिक कचरा इतरत्र कुठेही फेकत असल्याने जागोजागी वर्दळीच्या ठिकाणी कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात ढिग दिसून येत आहेत. कचरा व कचऱ्यातून निघणाऱ्या दुर्गंधीमुळे पर्यावरण आणि आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अर्थात एमआयडीसी अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या चाकण औद्योगिक वसाहतीत लघू आणि मोठे उद्योग आहेत. वाहन निर्मिती, अभियांत्रिकी व इतर क्षेत्रातील उद्योग, कंपन्यांमधून दररोज हजारो टन औद्योगिक कचरा निर्माण होतो. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी कसलीही सोय नाही. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा अपुरी आणि कुचकामी ठरत आहे. पावसाळ्यात हा कचरा ओढ्या नाल्यात मिसळून पाणी प्रदूषण होत आहे. रस्ता लगत असलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरते व डासांचा उपद्रव वाढत आहे. चाकण औद्योगिक वसाहतीत रस्त्याने ये जा करणारे नागरिक व कामगार रस्त्यालगत कचरा फेकत असल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग पडले आहेत. त्यासाठी कचरा उचलण्याची व्यवस्था अधिक सक्षम आणि भक्कम करणे गरजेचे आहे. चाकण एमआयडीसीत प्रवेश करताना सर्वप्रथम राणूबाई मळा, खराबवाडी, वाघजाई नगर, महाळुंगे इंगळे, खालूंब्रे, सावरदरी, आंबेठाण, बिरदवडी आदी गावांच्या हद्दीत रस्त्यालगत कचऱ्याचे मोठमोठे ढिग साचलेले दिसत आहेत. खराबवाडी लगतच्या वाघजाईनगर रस्त्यावर सांडपाणी साचल्याने दुचाकी चालक घसरून गंभीर जखमी झाले आहेत. जनावरांना चालताना लाज वाटेल, असे रस्ते झाले आहेत. या भागात सांडपाणी व कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात बकालपणा वाढीस लागला आहे. नागरिकांना दररोज वाहतूक कोंडी, कचरा समस्या, सांडपाणी यांच्याशी सामना करावा लागतो. चाकण भागात दिवसेंदिवस वाढत्या नागरिकीकरणामुळे व विस्तारत्या उद्योग नगरीमुळे कचऱ्याची समस्या अत्यंत जटील होत चालली असून, याकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. काही ठिकाणी एमआयडीसी भागात रस्त्यालगत कचरा जाळला जात असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## रस्त्यांवर गटारगंगा आली रे अंगणी

"बहुतांशी कंपन्यांमध्ये सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी जागा उपलब्ध नाही. सुरक्षितता बाळगली जात नसल्याने कंपन्यांमधून बाहेर आलेले पाणी थेट रस्त्याला आल्याने गटारगंगा तयार झाली आहे."

चाकण एमआयडीसीत एमआयडीसीने कचरा प्रकल्प उभारण्यासाठी फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजला जागा दिलेली आहे. त्याठिकाणी आद्ययावत कचरा प्रकल्प होणार आहे, अशी फक्त चर्चा झाली. कचरा प्रकल्प अद्याप झाला नसून कागदी घोडे नाचविण्यातच प्रशासन व्यस्त दिसत आहे. कचरा प्रकल्प कागदावरच राहणार की प्रकल्प सत्यात उतरणार, हे मात्र समजून येत नाही."

**- संदेश जाधव, सरचिटणीस, भाजपा, खेड तालुका**

# मसूर - उंब्रज व मसूर - श्यामगाव रस्त्यावर धुळीचे लोट

**मसूर (दै. संध्या)**

पाटण- पंढरपूर महामार्गाच्या रुंदीकरण व दुरुस्ती कामामुळे मसूर ते उंब्रज व मसूर ते शामगाव या रस्त्यावर सतत धुळीचे लोट उडत आहेत. गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या या कामामुळे डंपरसह अवजड वाहनांची सतत वर्दळ असल्याने रस्त्यावर धुळीचा थर साचला आहे. यामुळे दुचाकीधारकांसह शेतकरी, शाळकरी मुले, ज्येष्ठ तसेच ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावरून कांबीरवाडी, कोणेगाव, वडोली, धनकवडी, कवठे, उंब्रज आदी गावांतील नागरिक रोज ये-जा असते. मसूरच्या पूर्वेला माळवाडी, रिसवड, अंतवडी या ठिकाणीही अनेक जण प्रवास करतात; परंतु धुळीमुळे प्रवास करणे मुश्कील बनले आहे. धुळीने दुचाकीस्वारांना समोरचे काही दिसेनासे होत असल्याने अपघाताची भीती आहे. चारचाकी वाहनचालकांना काचा बंद करून प्रवास करावा लागतो. मात्र, दुचाकीधारकांना धुळीचे थर चेहऱ्यासह डोळ्यात, नाका-तोंडात जाऊन आरोग्यावर परिणाम होत आहेत. डोळे चुरचुरणे, लाल होणे, पाणी येणे, श्वसनाचा त्रास, खोकला, दमा यासारख्या समस्या वाढल्या आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसन विकार असलेल्यांना याचा फटका जास्त बसतो.

# चोपडज ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

**चोपडज (दै. संध्या)**



आज संत गाडगेबाबा जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.महीला सरपंच मनिषा भोसले यांनी गावातील कोट्यावधी रुपयांची विकासकामे मार्गी लावली आहेत याची दखल घेत व ग्रामपंचायत कार्यकाळ संपल्याने सरपंच व सदस्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी सरपंच सौ.मनिषा भोसले, ग्रामविकास अधिकारी दिपाली लडकत, ग्रामपंचायत सदस्य जयश्री गाडेकर,स्वाती यादव, ग्रामपंचायत कर्मचारी पार्वती शिंदे,तुषार शिंदे अंगणवाडी सेविका लता चव्हाण,रेश्मा गाडेकर मदतनीस,छाया लोणकर, पुजा गायकवाड यांनी गावातील लोकांना शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सदैव तत्पर राहून मदत केली.सरपंच यांच्या माध्यमातून चांगल्याप्रकारे कामे पार पडली आहेत म्हणून व आज ग्रामपंचायतीचा कारभार समाप्त झाला आहे त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूक होईपर्यंत प्रशासक म्हणून कार्यभार विद्यमान सरपंच यांना मिळाला आहे.म्हणून उमेश गायकवाड मा.उपसरपंच ग्रामपंचायत चोपडज/अध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा बारामती तालुका भाजपा पंचायत राज महाराष्ट्र प्रदेश सदस्य भाजपा यांच्या हस्ते या सर्वांचा सन्मान करण्यात आला.सर्वांना शाल,श्रीफळ व फोटो फ्रेम देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी उपस्थित संदीप गाडेकर,नवनाथ भोसले यांच्या उपस्थित होते.सुत्रसंचलन उमेश गायकवाड यांनी तर यावेळी उपस्थित असलेले संदीप गाडेकर,ग्रामविकास अधिकारी दिपाली लडकत, सरपंच मनिषा भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नवनाथ भोसले यांनी सर्वांचे आभार मानले.

# अस्तित्व टिकवण्यासाठी स्नेहसंमेलने आवश्यक : अध्यक्ष विलास बेलकर

**भिवंडी (दै. संध्या)**



कोळी मल्हार समाज संस्कृती, परंपरा,अस्तित्व व समाजाची अस्मिता टिकवण्यासाठी आणि समाजातील भावी पिढीला आपल्या जुन्या चालीरीती,परंपरा समजावून देण्याकरिता किंवा त्यांची ओळख होण्याकरिता अशा स्नेह संमेलनाच्या आयोजनाची अत्यंत आवश्यकता आहे. असे नुकताच टेन नाका मनोर पालघर या ठिकाणी ग्रामपंचायत हॉलमध्ये झालेल्या स्नेह संमेलनाच्या आयोजनासाठी घेतलेल्या बैठकीमध्ये अध्यक्ष म्हणून विलास बेलकर (अध्यक्ष - आदिवासी कोळी मल्हार समाज) मार्गदर्शन करताना म्हणाले. याप्रसंगी बोईसर चे आमदार विलास तरे,माजी आमदार राजेश पाटील, सुनील झळके हे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते.

बेलकर पुढे म्हणाले की, कोळी मल्हार या जमातीमध्ये होणारी घुसखोरी व बोगस आदिवासी प्रवृत्ती रोखण्यासाठी अशा स्नेह संमेलनातून सर्वांच्या मान्यतेने एक ठराव पारित करून, सरकारकडे देऊन अशा बोगस लोकांना प्रतिबंध करणे अत्यंत आवश्यक आहे. हे पाऊल आत्ताच उचलले नाही तर मात्र आयुष्यातील आपल्या भावी पिढीला त्याचे वाईट परिणाम भोगावे लागणार असल्याची भीती त्यांनी आपल्या भाषणामध्ये व्यक्त केली.

सदर बैठकीस मार्गदर्शन करताना विद्यमान आमदार विलास तरे यांनी सांगितले की, स्नेह संमेलनामध्ये जास्तीत जास्त युवा वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढवावा आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण कोळी मल्हार समाजाला उपस्थित राहण्याचे आवाहन करावे. यामुळे समाजाची संस्कृती व परंपरा संवर्धनाचे काम या माध्यमातून होण्यास मदत होईल.

माजी आमदार राजेश पाटील यांनी याप्रसंगी "कोळी मल्हार जमातीचे अस्तित्व व अस्मिता टिकवण्यासाठी अशी संमेलन युवा पिढीला मार्गदर्शक ठरणार आहेत."अशा स्नेह संमेलनातून समाजातील गुणवंत विद्यार्थी तसेच तरुण तरुण यांनी विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या उत्तम कामगिरी संदर्भात सन्मानित करून,त्यांना प्रोत्साहन ही द्यायला हवे. अशी सूचनाही त्यांनी केली.

याप्रसंगी लेखक, पत्रकार व ट्रायबल फोरम, महाराष्ट्र या संघटनेचे कोकण विभागीय कार्याध्यक्ष सुनील झळके यांनी असे सांगितले की, आज संपूर्ण आदिवासी समाजाची आरक्षण,रोजगार, मूळ जमिनीपासून वंचित ठेवण्याची आणि सुरुवातीपासून ते आज पर्यंत विविध पद्धतीने अन्यायाची वारंवारपणे असलेली परंपरा, अशा सर्वार्थाने आदिवासी समाजाची अत्यंत हालाखीची परिस्थिती झालेली आहे. कुठेतरी समाजाने एकत्रितपणाची वज्रमुठ बांधल्यास आपल्यावर होणाऱ्या अन्यायांच्या साखळीवर घाव घालता व रोखता येईल. आणि आता ही वेळ आलेली आहे. त्यामुळे सर्वांनी स्नेह संमेलनाला एकत्रित येण्याचे आवाहनही झळके यांनी केले आहे.

सदर बैठकीसाठी अरुण कदम (डहाणू तालुका अध्यक्ष), ममता गडग (पालघर तालुका अध्यक्ष),गंगाराम वारंगडे (विक्रमगड तालुका अध्यक्ष),कृष्णा जाधव, प्रभाकर शेलार,सरपंच सदू गणेशकर,अनंता पुंजारा,संजय भुयाळ, रमेश कुंभारे,सुनील गायकवाड, सिताराम माळी, ॲड. सुनंदा बेलकर माधवी डगला रज्जू सातवी प्रशांत गोवारी सुरेश बेलकर, सुनील सांबरे मोहन गुहे, युट्युब व मिमिक्री कलाकार दिनेश भोईर, प्रकाश बसवत आदी मान्यवर उपस्थित होते . याप्रसंगी सर्वांनी स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी आपले विचार व मार्गदर्शन व्यक्त केले.

सदर बैठकीमध्ये "आदिवासी,कोळी मल्हार स्नेहसंमेलन-२०२६" चे सातवे स्नेहसंमेलन हे दिनांक ३ मे २०२६ रोजी जिल्ह्यातील मनोर या ठिकाणी घेण्याचे सर्वानुमते निश्चित करण्यात आले आहे. याप्रसंगी कोळी मल्हार समाजातील समाज बांधवांची लक्षणीय उपस्थिती लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर भोईर यांनी तर आभार प्रदर्शन नितीन बोंबाडे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### नागपूर महानगरपालिकेत येणार 100 टक्के महिलाराज, अध्यक्षपदी मातृशक्ती

नागपूर (दैनिक संध्या) : नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षपदासह विविध विशेष समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने मोठा निर्णय घेतला आहे. नागपूर मनपात 'महिलाराज' प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने पक्षाने स्थायी समिती, परिवहन समिती आणि अन्य १० विविध विशेष समित्यांच्या अध्यक्षपदी महिलांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय विरोधकांनादेखील महिलांनाच संधी देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जर असे झाले तर असा पुढाकार घेणारे नागपूर हे देशातील पहिले शहर ठरू शकेल. भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी याबाबत पक्षाची भूमिका मांडली. महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या पुढाकारातून प्रेरणा घेत नागपूर महानगरपालिकेतही महिलांना पूर्ण नेतृत्व देण्याचा विचार पुढे आला. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व स्तरांवर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर भाजपच्या कोअर समितीच्या बैठकीत नागपूर महानगरपालिकेतील सर्व समित्यांच्या अध्यक्षपदी महिलांनाच संधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार स्थायी समिती, परिवहन समिती तसेच इतर सर्व समित्यांचे अध्यक्षपद महिलांकडेच असेल. एवढेच नव्हे तर येणाऱ्या काळात महानगरपालिकेच्या दहा झोनच्या सभापतीपदीदेखील महिलांचीच नियुक्ती केली जाणार आहे. प्रशासनात महिलांचे नेतृत्व मजबूत करण्याच्या दृष्टीने भाजपने शंभर टक्के महिलांना जबाबदारी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिका देशातील महिलांच्या पूर्ण नेतृत्वाखाली चालणारी पहिली महानगरपालिका ठरेल असे तिवारी यांनी स्पष्ट केले. दरम्यान, काँग्रेसच्या वाट्याला स्थायी समितीतील चार जागा आल्या असून, त्या जागांवरही महिलांनाच संधी देण्याचे भाजपकडून आवाहन करम्यात आले आहे. तसेच एमआयएम आणि मुस्लिम लीगनेही महिलांना संधी देत या ऐतिहासिक निर्णयात सहभागी व्हावे, तिवारी म्हणाले.

### कुऱ्हाड, टिकास व सब्बलने वार करून भाच्याने मामाला संपवले

पाटणसावंगी (दैनिक संध्या) : दारू प्यायल्यानंतर मामा व भाच्यात किरकोळ कारणावरून भांडण झाले आणि याच भांडणात भाच्याने मामाची कुऱ्हाड, टिकास व सब्बलने वार करून निघृण हत्या केली. ही घटना सावनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाटणसावंगी येथे रविवारी (दि. २२) रात्री ८:४० वाजताच्या सुमारास घडली असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. केसरी गज्जू कावरे (वय ५०, रा. बालाघाट, मध्य प्रदेश) असे मृत मामाचे, तर सूर्यकांत कलतराम नागेश्वर (२१, रा. पाटणसावंगी, ता. सावनेर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपी भाच्याचे नाव आहे. केसरी हा पाटणसावंगी येथील आरामशीनमध्ये कामगार म्हणून काम करायचा आणि आरामशीनजवळ असलेल्या खोलीत राहायचा. सूर्यकांत हा पाटणसावंगी येथील बीअर बारमध्ये वेटर म्हणून काम करायचा. विशेष म्हणजे, दोघांनाही दारूचे व्यसन होते. केसरी रविवारी रात्री सूर्यकांतच्या घरी गेला होता. त्यावेळी दोघेही दारूच्या नशेत होते. घरातील मंडळीसमोर किरकोळ कारणावरून त्या दोघांमध्ये शाब्दिक भांडण झाले आणि ते विकोपास गेले. काही कळण्याच्या आत सूर्यकांतने केसरीवर कुऱ्हाड, टिकास व सब्बलने वार केले. गंभीर दुखापतीमुळे त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी सागर खर्डे, ठाणेदार उमेश पाटील सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करीत आरोपीला अटक केली व केसरीचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नागपूर शहरातील मेयो हॉस्पिटलमध्ये पाठविला. याप्रकरणी सावनेर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक बाळू राठोड व शिपाई कपोल तभाने करीत आहेत. आरोपी सूर्यकांतने केसरीच्या डोके व छातीवर कुऱ्हाड आणि सबलीने जबर वार केले. त्याच्या खोल जखमा त्याच्या शरीरावर स्पष्ट दिसून येत होत्या. त्यामुळे पोलिसांनी घटनास्थळाहून त्याने हत्या करण्यासाठी वापरलेली कुऱ्हाड, टिकास व सब्बल जप्त केली आहे. हत्या केल्यानंतर सूर्यकांत पळून गेला नाही.

# श्री गुरु तेग बहादुर साहेबजी : धर्मस्वातंत्र्यासाठी बलिदान देणारे महान गुरु

**भारताच्या इतिहासात अनेक संत, महात्मे आणि क्रांतिकारकांनी आपल्या विचारांनी व कार्यांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यापैकी शीख धर्माचे नववे गुरु गुरु तेग बहादुर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते. त्यांचे जीवनकार्य हे केवळ शीख समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.**



- रणजित पवार, उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

मुंबई (दै. संध्या)

**जन्म आणि बालपण :** गुरु तेग बहादुर यांचा जन्म १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. त्यांचे वडील गुरु हरगोबिंद हे शीख धर्माचे सहावे गुरु होते. बालपणी त्यांचे नाव त्यागमल असे होते. लहान वयातच त्यांनी शौर्य, संयम आणि आध्यात्मिकतेची चिन्हे दाखवली. वडिलांकडून त्यांनी शस्त्रविद्या आणि धर्मज्ञान यांचे शिक्षण घेतले. एकदा मुघल सैन्याविरुद्ध झालेल्या युद्धात त्यांनी पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्यामुळे त्यांना तेग बहादुर (तेग म्हणजे तलवार, बहादुर म्हणजे शूर) हे नाव देण्यात आले. पुढे ते याच नावाने ओळखले जाऊ लागले.

**आध्यात्मिक साधना आणि समाजकार्य :** गुरु तेग बहादुर यांनी आयुष्यातील अनेक वर्षे ध्यान, साधना आणि समाजसेवेसाठी अर्पण केली. त्यांनी पंजाब, बिहार, आसाम आणि बंगाल अशा विविध प्रदेशांत प्रवास करून लोकांना सत्य, प्रेम आणि सहिष्णुतेचा संदेश दिला. त्यांनी अंधश्रद्धा, अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला.

त्यांच्या शिकवणीत नम्रता, संयम, परोपकार आणि ईश्वरभक्ती यांना विशेष महत्त्व होते. त्यांनी लोकांना सांगितले की खरा धर्म हा मानवतेची सेवा करण्यात आहे. त्यांचे अनेक विचार गुरु ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत. त्यांच्या रचनांमध्ये वैराग्य, निडरता आणि आत्मबल यांचे सुंदर वर्णन आढळते.

**आनंदपूर साहिबची स्थापना :** गुरु तेग बहादुर यांनी पंजाबमध्ये आनंदपूर साहिब या शहराची स्थापना केली. हे ठिकाण पुढे शीख धर्माचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. येथे त्यांनी धर्मप्रसार आणि समाजरचना यांचे कार्य केले. आनंदपूर साहिब आजही शीख समुदायासाठी अत्यंत पवित्र स्थान मानले जाते.

**मुघल काळ आणि धार्मिक अत्याचार :** त्या काळात भारतावर मुघलाचे याचे राज्य होते. त्यांच्या कारकीर्दीत धार्मिक असहिष्णुता वाढली होती. जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणण्याचे प्रकार सुरू होते. विशेषतः काश्मीरमधील हिंदूंवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत होते.काश्मिरी पंडितांनी या अन्यायाविरुद्ध मदतीसाठी गुरु तेग बहादुर यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी त्यांना संरक्षण देण्याचे आश्वासन दिले. गुरुजींनी स्पष्ट सांगितले की जर त्यांना इस्लाम स्वीकारायला भाग पाडले जात असेल, तर आधी मला धर्मांतर करावे लागेल. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे ते मुघलांच्या रोषाला सामोरे गेले.

**बलिदान :** गुरु तेग बहादुर यांना अटक करून दिल्ली येथे आणण्यात आले. त्यांच्यावर इस्लाम स्वीकारण्याचा दबाव टाकण्यात आला; परंतु त्यांनी धर्मांतरास नकार दिला. शेवटी ११ नोव्हेंबर १६७५ रोजी त्यांची हत्या करण्यात आली.

त्यांचे बलिदान मानवतेच्या इतिहासातील एक महान घटना मानली जाते. त्यांनी स्वतःच्या धर्मासाठी नव्हे, तर इतरांच्या धर्मस्वातंत्र्यासाठी प्राण दिले. त्यामुळे त्यांना "हिंद की चादर" ही उपाधी मिळाली.

ज्या ठिकाणी त्यांचे शिर छाटण्यात आले, त्या ठिकाणी आज गुरुद्वारा शीश गंज साहिब उभा आहे. हे स्थान त्यांच्या बलिदानाची साक्ष देत आजही लाखो भाविकांना प्रेरणा देते.

**गुरु गोविंदसिंहांवर प्रभाव :** गुरु तेग बहादुर यांचे सुपुत्र गुरु गोविंदसिंह पुढे शीख धर्माचे दहावे गुरु झाले. वडिलांच्या बलिदानाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. पुढे त्यांनी खालसा पंथाची स्थापना करून शीख धर्म अधिक संघटित व बळकट केला. गुरु तेग बहादुर यांच्या शिकवणीमुळेच शीख समाजात निडरता आणि त्यागभाव दृढ झाला.

शिकवण आणि विचार

गुरु तेग बहादुर यांच्या शिकवणीचा
मुख्य गाभा म्हणजे —
सत्याचा मार्ग कधीही सोडू नका.
अन्यायाविरुद्ध ठाम उभे रहा.
सर्व धर्मांचा आदर करा.
ईश्वरभक्ती आणि मानवसेवा
यांचा संगम साधा.

त्यांच्या रचनांमध्ये जीवनाचे क्षणभंगुर स्वरूप आणि आत्मिक शांतीचा संदेश आहे. त्यांनी माणसाला भयमुक्त आणि आत्मनिर्भर बनण्याचा उपदेश केला.

गुरु तेग बहादुर यांचे जीवन हे त्याग, शौर्य आणि मानवतेचे प्रतीक आहे. त्यांनी धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी स्वतःचा बळी दिला, परंतु आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. त्यांचे कार्य आणि बलिदान भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.


आजच्या काळातही श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या विचारांची गरज अधिक आहे. धार्मिक सहिष्णुता, परस्पर आदर आणि मानवतेची भावना जपणे हीच त्यांच्या प्रति खरी श्रद्धांजली ठरेल. श्री गुरु तेग बहादुर यांचे जीवन आपल्याला शिकवते की सत्य आणि न्यायासाठी लढताना कितीही संकटे आली तरी धैर्य सोडू नये.

त्यांचे बलिदान हे केवळ एका धर्माचे नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्याचे प्रतिक आहे. म्हणूनच ते भारतीय इतिहासातील एक अजरामर आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून सदैव स्मरणात राहतील.

श्री गुरु तेग बहादुर साहेबजी यांचा त्याग, त्यांची अध्यात्मिक साधना आणि समाज कार्य, बलिदान, शिकवण आणि विचार समाजात रुजावेत यासाठी त्यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे आयोजन प्रथम नागपूरला नंतर नांदेड येथे झाले. आता दि. 28 फेब्रुवारी व 1 मार्चला नवी मुंबई येथील ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर येथे होत आहे. या समागमामध्ये देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रिय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री महोदय, महनिय व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. आपणही या शहीदी समागमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि समाजप्रबोधन

मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सुधारणावादी परंपरेत १९०५ ते १९५६ असे सतत पाच दशके ज्यांनी समाज सुधारणा घडवून आणल्या, त्या कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची जयंती (दि. २३ फेब्रुवारी). भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र,गरीब मुला -मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, दिव्यांगांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी -मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दुःखी व हतबल असणाऱ्यांना हिम्मत देण्याची आचरण सूत्री सांगून त्यालाच रोकडा धर्म म्हणणारे गाडगेबाबा आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वातही समाजाचा आरसा बनून मार्गदर्शन करत आहे.

गाडगेबाबा म्हणजे भारतीय समाजसुधारणेतील आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व. वैराग्याचा मूर्तिमंत अविष्कार म्हणजे गाडगेबाबा. लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ म्हणजे गाडगेबाबा. अंधश्रद्धेवर थेट प्रहार म्हणजे गाडगेबाबा. दिव्यांगांचा, निराश्रीतांचा बाप म्हणजे गाडगेबाबा. जातीभेदांवर प्रहार म्हणजे गाडगेबाबा. हिंसात्मक कुळधर्मांना, नवसाला हद्दपार करणारा कर्मयोगी म्हणजे गाडगेबाबा. मुक्या प्राण्यांच्या बळी प्रथेविरुद्धचा प्रबोधनकार म्हणजे गाडगे बाबा. थोडक्यात त्यांच्या जीवनाचे ध्येय सर्वसामान्यांचे कल्याण, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि देवधर्माच्या अंध फेऱ्यात अडकून पडलेल्या समाजाला मानवतेचा श्रेष्ठ आदर्श घालणे होते.

संत गाडगेबाबांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव येथे झाला. लहानपणी त्यांना डेबू म्हणत. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई होते. आडनाव जानोरकर. लहानपणीच व्यसनाधीनतेने वडिलांचे निधन झाल्यामुळे ते आपल्या आईसोबतअकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे या गावी मामाकडे राहायला गेले. त्यांच्या जीवनातील प्रारंभिक काळातील संघर्षांनी,कुप्रथांनी व त्यातून आलेल्या दुःखांनी त्यांच्या मनात समाजसेवेचा आणि दीन-दुखितांच्या मदतीचे बीज रुजवले.शेती,माती,संसारामध्ये रमलेल्या डेबुजींना तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा व कुप्रथांनी समाजासाठी लढण्यास प्रवृत्त केले. 1905 नंतर त्यांनी कुटुंब आणि संसार त्यागून गावोगावी फिरून लोकांना समाजातील दोष समजावून सांगण्याचा निर्णय घेतला.केवळ महाराष्ट्रच नाहीत तर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व अन्य राज्यातही त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले.

त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा भाग म्हणजे कीर्तनात्मक भजनातून अंधश्रध्दा निर्मूलन केले. आपल्या वऱ्हाडी भाषेमध्ये सहज विनोदाची, संवादाची पेरणी करत आणि जगण्यातील विसंगती मांडत त्यांनी कर्मकांडावर हल्ला केला.त्यांचे कीर्तन म्हणजे विवेचनकार आणि श्रोते यांच्यातील प्रश्नोत्तराचा सुलभ सादरीकरणाचा प्रबोधनात्मक अविष्कार होता.या अशिक्षित माणसाच्या कीर्तनाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून आचार्य प्र.के. अत्रे, पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या विद्वानांनी खाली बसून रसग्रहण केले.साध्या सोप्या शब्दांमध्ये ते विवेचन करायचे. त्यांच्या विवेचनाला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाचे पार्श्वगायन असायचे. विशेष म्हणजे संपूर्ण श्रोते भजन गायनात सहभागी व्हायचे.समाजाच्या अंधश्रद्धा, चाली, रुढी ,परंपरा यावर तुटून पडण्याच्या त्यांच्या आक्रमक शैलीचे वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी म्हटले होते... "सिंहाला पहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, गाडगेबाबांना पहावे कीर्तनात.."

भारतीय संत परंपरेतील क्रांतिकारक विचार मांडणाऱ्या संत तुकाराम, संत कबीर यांच्या अभंग आणि दोह्यांचा अचूक वापर ते त्यांच्या कीर्तनात करायचे...

मुला-मुलींच्या जन्मासाठी मुक्या असाह्य प्राण्यांची हत्या करून नवस फेडणे आणि त्यासाठी कर्ज काढणे अशा रूढींवर ते आक्रमणपणे प्रहार करायचे. तुकोबारायांच्या अभंगांचा वापर करताना ते म्हणायचे...

नवसे कन्या पुत्र होती
मग का करणे लागे पती
किंवा पिंडदानासारख्या अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना कीर्तनात कबीराचे दोहे वापरायचे...
जीते बाप को रोटी ना दे
वह मरे बाद पछताए
मुठ भर चावल लेकर
कौवा को बाप बनाएं
उठ सूट शेंदूर पासून देव बनवणे.
पुढे त्याचे मंदिर घडविणे आणि
कर्मकांडात समाजाला बुडविणे
याला विरोध करताना ते म्हणायचे...
जत्रा मे पत्रा बिथाया
तीर्थे बनाया पानी
भई दुनिया बड़ी दिवानी ये
तो पैसे की धुलधानी :

त्यांचे समाजप्रबोधनाचे विचार त्या काळातील भारतीय ग्रामीण जीवनाची परिस्थिती बदलण्याचा क्रांतीकारी प्रयत्न होते. त्या काळात भारतीय ग्रामीण भागामध्ये अंधश्रद्धा, कर्मकांड, नशा,धर्मभेद,प्राण्यांचे बळी, जातीभेद,अस्पृश्यता,हुंडा पद्धती आणि निरक्षरता या सर्व सामाजिक बंधनांनी लोकांचे मन जड झालेले होते. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनात अंधश्रद्धा, देव-धर्मा विषयी चुकीचे विश्वास आणि सार्वजनिक अस्वच्छते विरुद्ध आघात केला.

गाडगेबाबांचे कार्य सर्वसामान्यांसाठी समर्पित होते. त्यांनी सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य विषयक संदेश देण्यासाठी ते ज्या गावात प्रवेश करत, तेथे प्रथम स्वयं आणि उपस्थित लोकांसोबत मिळून रस्ते, सार्वजनिक जागा, मंदिर परिसर, तलाव अशा सर्व ठिकाणी स्वच्छता अभियान राबवायचे.याच ठिकाणी त्यांनी धर्मशाळा, आश्रम शाळा, नद्यांचे घाट, पाणपोया, गोरक्षण उघडले. स्वतः खराटा घेऊन त्यांची स्वच्छता सुरू व्हायची.त्यांचा संदेश फक्त उपदेश स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्ष कार्य करून दाखवून देण्याची प्रेरणा म्हणून होता.

कीर्तनाचा प्रारंभ हा स्वच्छता अभियानातून करणारा हा महापुरुष तत्कालीन समाज व्यवस्थेत धार्मिक पाखंडावर आसूड उमटवायचा. मंदिरात देव शोधणे ऐवजी माणसातच देव शोधा हा त्यांचा परखड संदेश होता. देव दगडात नाही तो माणसात आहे, असे ते देवकीनंदन गोपाला हे भजन गाताना उदाहरणे देऊन व श्रोत्यांशी संवाद साधून ते स्पष्ट करायचे.

गाडगेबाबांनी फक्त भाषण किंवा कीर्तनाचाच अवलंब केला नाही, तर त्यांनी आपल्या कमाईतून आणि लोकांच्या देणगीतून अनेक धर्मशाळा, अन्नछत्र, वृद्धाश्रम, गोशाळा आणि रुग्णालय परिसरात धर्मशाळा उभारल्या.मुंबई ,पंढरपुर, नाशिक, पुणे, आळंदी, देहू आणि अमरावती येथे त्यांच्या पुढाकारात धर्मशाळा उभारल्या गेल्या.

# शीख समाजातील लंगर सेवा : मानवतेचा समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श

**भारतीय संस्कृती आणि धर्मपरंपरा विविधतेत एकतेचा संदेश देणारी आहे. या महान परंपरेतील शीख धर्म हा मानवता, समता, सेवा आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा एक प्रभावी धर्म म्हणून ओळखला जातो. शीख धर्माची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जागतिक स्तरावर आदर्श ठरलेली परंपरा म्हणजे लंगर सेवा. लंगर सेवा ही केवळ धार्मिक विधी नसून, ती सामाजिक समतेची, परोपकाराची आणि मानवी करुणेची जिवंत परंपरा आहे.**





संजीवनी स.जाधव-पाटील, सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहित कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई

मुंबई (दै. संध्या)

**लंगर सेवेचा ऐतिहासिक उद्गम :** लंगर सेवेची संकल्पना शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक देव जी यांनी 15 व्या शतकात मांडली. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. गुरू नानक देव जी यांनी या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेला आव्हान देत सर्व मानव समान असल्याचा संदेश दिला. त्यांनी गुरुद्वारामध्ये सर्वांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था सुरू करून समाजातील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

पुढील गुरूंनी लंगर परंपरेला अधिक सुसंगठित आणि व्यापक स्वरूप दिले. विशेषतः गुरू अमरदास जी यांनी 'पंगत' आणि 'संगत' या संकल्पनांचा प्रचार करून लंगर सेवेचा सामाजिक पाया मजबूत केला. गुरुद्वारामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने गुरूंच्या दर्शनापूर्वी लंगरमध्ये बसून भोजन करावे, असा नियम त्यांनी केला. यामुळे समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजात रुजला.

**लंगर सेवेची तत्त्वज्ञानात्मक संकल्पना :** लंगर सेवेचे तत्त्वज्ञान तीन मूलभूत मूल्यांवर आधारीत आहे. समता, सेवा आणि सामूहिकता. शीख धर्मानुसार देव सर्वत्र आहे आणि सर्व मानव देवाचेच अंश आहेत. त्यामुळे मानवांमध्ये भेदभाव करणे म्हणजे देवाच्या इच्छेचा अवमान करणे होय. लंगर सेवेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील लोक एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. राजा असो वा सामान्य नागरिक, श्रीमंत असो वा गरीब, स्त्री असो वा पुरुष—सर्वांसाठी समान आसन आणि समान अन्न दिले जाते.

लंगरमध्ये सेवा करणे हे शीख धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते. अन्न तयार करणे, वाटप करणे, पाणी देणे, भांडी धुणे, स्वच्छता राखणे. हे सर्व कार्य स्वयंसेवक भावनेने केले जाते. या सेवेचे मूळ उद्दिष्ट अहंकाराचा त्याग करून मानवसेवेला सर्वोच्च मानणे हा आहे.

**लंगर सेवेची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती :** लंगर सेवेची कार्यपद्धती अत्यंत सुव्यवस्थित आणि लोकसहभागावर आधारीत आहे. याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**मोफत भोजन व्यवस्था :** लंगरमध्ये कोणालाही शुल्क न देता अन्न दिले जाते.

सर्वधर्मसमभाव: कोणत्याही धर्म, जात, भाषा किंवा देशातील व्यक्तीसाठी लंगर खुले आहे.

सामूहिक भोजन पद्धती: सर्वजण जमिनीवर एकाच पंक्तीत बसून भोजन करतात, ज्यामुळे सामाजिक समतेची जाणीव निर्माण होते.

*स्वयंसेवी सहभाग: लंगर सेवा स्वयंसेवकांच्या सहभागावर चालते. समाजातील प्रत्येक व्यक्ती सेवा देऊ शकतो.*

*साधे आणि सात्त्विक अन्न: लंगरमधील भोजन साधे, पोषणमूल्यपूर्ण आणि सात्त्विक असते.*

*शिस्त आणि स्वच्छता: लंगरमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सामूहिक सहकार्य यांना विशेष महत्त्व दिले जाते.*

*लंगर सेवा आणि सामाजिक परिवर्तन*

लंगर सेवा ही केवळ धार्मिक सेवा नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. इतिहासात भारतात जातीभेदामुळे समाजात विभाजन होते. लंगरने या विभाजनावर प्रहार करून समानतेचा संदेश दिला. गुरुद्वारामध्ये सर्वजण एकत्र बसून भोजन करतात, त्यामुळे सामाजिक भेदभाव नष्ट होतो आणि बंधुभाव वाढतो.

लंगर सेवा स्त्री-पुरुष समानतेचेही प्रतीक आहे. स्त्रिया आणि पुरुष समान अधिकाराने सेवा करतात. त्यामुळे लिंगभेदाविरुद्ध सामाजिक संदेश दिला जातो. तसेच लंगर सेवा गरीब, गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी आधारस्तंभ ठरते.

**आधुनिक काळातील लंगर सेवेचे जागतिक योगदान :** आज लंगर सेवा केवळ भारतापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर मानवतेची सेवा करणारी चळवळ बनली आहे. भारतातील अमृतसर येथील हरमंदिर साहिब (स्वर्ण मंदिर) येथे दररोज लाखो भाविक आणि पर्यटकांना लंगर दिला जातो. हे जगातील सर्वात मोठ्या सामूहिक भोजन व्यवस्थांपैकी एक मानले जाते.

नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप, दुष्काळ, युद्ध किंवा महामारीच्या काळात शीख समाजाने लंगर सेवेच्या माध्यमातून जगभर मानवतेची सेवा केली आहे. कोरोना महामारीच्या काळात भारतासह विविध देशांमध्ये शीख स्वयंसेवकांनी गरजू लोकांना मोफत भोजन पुरवले. ही सेवा मानवतेसाठी प्रेरणादायी ठरली.

**लंगर सेवेचा आध्यात्मिक आणि नैतिक संदेश :** लंगर सेवा ही केवळ भौतिक अन्नपुरवठा नसून ती आध्यात्मिक शिक्षणाची प्रक्रिया आहे.

सेवा करताना अहंकाराचा त्याग, करुणेची भावना आणि मानवतेचा आदर विकसित होतो. शीख धर्मानुसार सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा होय. गुरू ग्रंथ साहिबमध्ये सेवेला अत्यंत महत्त्व देण्यात आले असून, सेवेमुळे मानवाला आत्मिक शांती आणि नैतिक उन्नती प्राप्त होते, असा संदेश दिला आहे.

लंगर सेवा मानवी मूल्ये जपण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करते. प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक घटक असून समाजसेवेसाठी योगदान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, ही भावना लंगरच्या माध्यमातून रुजवली जाते.

**शासकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून लंगर सेवा :** शासकीय दृष्टिकोनातून पाहता लंगर सेवा ही सामाजिक समावेशन, अन्नसुरक्षा आणि समुदाय विकासाची प्रभावी संकल्पना आहे. ही सेवा सामाजिक विषमता कमी करण्यास, गरिबी निवारणास आणि आपत्ती व्यवस्थापनात सहाय्यक ठरते. स्वयंसेवी संस्थांद्वारे आणि धार्मिक संस्थांद्वारे राबवली जाणारी ही सेवा सामाजिक सहभाग आणि लोकसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

लंगर सेवा ही लोकशाही मूल्यांशी सुसंगत असून समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांना प्रोत्साहन देते. त्यामुळे सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये आणि सामाजिक विकास कार्यक्रमांमध्ये लंगर मॉडेलचा अभ्यास प्रेरणादायी ठरू शकतो.

लंगर सेवा ही शीख धर्माची एक महान देणगी असून ती मानवतेच्या समतेचे, सेवाभावाचे आणि बंधुतेचे प्रतीक आहे. ही सेवा धार्मिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक अशा सर्व स्तरांवर मानवाला प्रेरणा देते. आजच्या काळात वाढती विषमता, सामाजिक तणाव आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास यामुळे लंगर सेवेचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो.

"सेवा हीच सर्वोच्च पूजा" हा विचार लंगर सेवेच्या माध्यमातून संपूर्ण जगाला मिळालेला आहे. म्हणूनच लंगर सेवा ही केवळ शीख समाजाची परंपरा नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय आदर्श व्यवस्था आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

अर्धापूर (दैनिक संध्या) : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव अर्धापूर तालुका अधिवक्ता संघाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी उपस्थित सर्व विधिज्ञांनी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.त्यानंतर अधिवक्ता संघाचे ज्येष्ठ विधिज्ञ बी.एस.मगरे यांनी शिवरायांचे कार्य व जीवनगाथा याविषयी सखोल असे मनोगत व्यक्त केले.त्यानंतर अधिवक्ता संघाचे सहसचिव अँड.सचिन देशमुख पार्डीकर यांनी शिवाजी महाराजांनी केलेला संघर्ष,त्यांचा लढा,राज्य चालवण्याचे कौशल्य आणि बुद्धीमत्ता,त्यांच्या शोर्याची जीवनगाथा आदि विविध विषयांवर सविस्तर असे मनोगत व्यक्त केले.त्यानंतर अँड.गणेश देलमडे यांनी शिवरायांच्या बालपणापासून ते त्यांच्या शेवटच्या कार्यापर्यंत प्रगल्भ असे मनोगत व्यक्त केले.यावेळी अधिवक्ता संघाचे सचिव अँड.दिपक लोणे,कोषाध्यक्ष.अँड गजानन पत्रे, सदस्य अँड.आत्माराम राजेगोरे,अँड. अभिजीत पांडे,अँड.नितेश लोणे, अँड.मंगेश सरोदे,अँड.रोहित देशमुख, अँड.ओंकार देवडे,अँड गंगाधर राऊत न्यायालयीन कर्मचारी गोविंद वाघमारे,ऋषिकेश मगरे,राम चिकाळकर,आनंद कोकाटे आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन अँड.गौरव सरोदे यांनी केले तर आभार अँड.दिलीप मोरे यांनी मानले.




### प्राथमिक शाळांनी राज्यस्तरीय शैक्षणिक मुल्यमापनात उल्लेखनीय कामगिरी केली

नाझरे सुपे (दैनिक संध्या) : राज्य शैक्षणिक संशोधनाने प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी राज्यभर परिक्षा घेण्यात आली या परिक्षेच्या अधिकृत डॅशबोर्ड नुसार महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद शहरांच्या श्रेणीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची तुलनात्मक आकडेवारी नुसार पुणे जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या सर्व घटकामध्ये उच्च गुणवत्ता दर्शविली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय मुल्यमापनात राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या श्रेणीमध्ये पुणे जिल्ह्याच्या जिल्हा परिषद शाळांनी प्रथम क्रमांक मिळवणे ही सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी व पालक उपस्थित संयुक्त प्रयत्नांची फलश्रुती आहे.गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित शैक्षणिक निरीक्षण आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम यामुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे. आगामी काळातही जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे मत पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गजानन पाटील (भा.प्र.से) यांनी व्यक्त केले तसेच प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.चंद्रकांत वाघमारे, शिक्षणाधिकारी श्री.संजय नाईकडे यांनी सर्व संबंधित गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




### पर्यावरणाचे महत्व सांगण्याऱ्या निसर्ग दाता ग्रंथास ग्रंथ साहित्य पुरस्कार

पुणे (दैनिक संध्या) : पर्यावरण विषयाचे अभ्यासक, स्तंभलेखक व निरगुडसर गावचे पोलीस पाटील विठ्ठल वळसे पाटील लिखीत "निसर्ग दाता" या वैचारिक ग्रंथास पुणे येथे पार पडलेला राज्यस्तरीय शासकीय मराठी साहित्य संमेलन - २०२६ संमेलनात मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ साहित्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. नुकतेच पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर मध्ये पुणे महानगरपालिका, मराठी भाषा संवर्धन समिती, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधनी (यशदा) व संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय राज्यस्तरीय शासकीय मराठी साहित्य संमेलन - २०२६ पार पडले. या संमेलनात विविध लेखकांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. "ग्रंथ साहित्य पुरस्कार" महेश भागवत अतिरिक्त महासंचालक कायदा सुव्यवस्था तेलंगणा, सचिन इटकर क्षेत्रीय संचालक महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, शेखर गायकवाड अतिरिक्त महासंचालक, डॉ. किरण धांडे यशदा प्रभारी अधिकारी, सुनील महाजन संवाद पुणे संचालक, व्यंकटेश कल्याणकर माध्यम व प्रकाशन विभाग यशदा या मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक, स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. निसर्ग दाता या पुस्तकाला विविध साहित्य संस्थांनी गौरविले आहे. लेखक वळसे पाटील हे गेली ३० वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात असून निसर्ग दाता या ग्रंथात पर्यावरण विषयक वैचारिक तत्वज्ञान मांडले आहे.

### इंद्रायणी प्रदूषणावर महापौर कार्यालयात आढावा बैठक

पिंपरी (दैनिक संध्या) : इंद्रायणी नदीचे केवळ स्वच्छता अभियानांनी संवर्धन होणार नाही, तर प्रदूषणाच्या मुळावर घाव घालणे अत्यावश्यक आहे, असा ठाम निर्धार मंगळवारी महापौर कार्यालयात झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि आळंदी नगरपरिषद यांच्यात इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत सविस्तर आढावा बैठक महापौर दालनात पार पडली. औद्योगिक सांडपाणी, केमिकल्स तसेच सोसायट्यांचे अशुद्ध सांडपाणी इंद्रायणीमध्ये सोडले जाणार नाही, यासाठी कठोर आणि प्रभावी यंत्रणा उभी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्या आणि संबंधित घटकांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही महापौर रवि लांडगे यांनी दिला. “नदी स्वच्छ हवी असेल, तर निर्णयही तितकेच कठोर असणे गरजेचे आहे,” असा एकमताने सूर बैठकीत उमटला. या बैठकीस पर्यावरण विभागाचे अधिकारी संजय कुलकर्णी, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी नगरपरिषदचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, नगरसेविका ऋतुजा तापकीर, साक्षी कुऱ्हाडे, पुजा घुंडरे, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, संतोष रासकर, पुणे भाजपा सचिव किरण येळवंडे, विवेक घुंडरे, अनिकेत तापकीर, संजय घुंडरे उपस्थित होते. इंद्रायणी नदीच्या शाश्वत संवर्धनासाठी दोन्ही प्रशासनांनी समन्वयाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जय गणेश जलाशयात ४० टक्के पाणीसाठा

## पिंगोरी परिसरातील पाणीस्थिती समाधानकारक



**नीरा (दै. संध्या)**

मागील वर्षी मान्सूनपूर्व तसेच मान्सून काळात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे पुरंदर तालुक्यातील पिंगोरी, कवडेवाडी, दौंडज खिंड व कडेपठार परिसरातील पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. याचा थेट फायदा पिंगोरी येथील जय गणेश जलाशयाला झाला असून सध्या जलाशयात ७.४९ दश लक्ष घनफूट म्हणजेच सुमारे ४० टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती गराडे पाटबंधारे शाखेचे शाखाधिकारी अविनाश जगताप यांनी दिली.

यावर्षी मान्सूनपूर्व पावसानेच चांगली हजेरी लावल्यामुळे जून महिन्यातच जय गणेश जलाशय पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला होता. मागील तीन वर्षांतील अल्प पर्जन्यमानामुळे जलाशय पूर्ण भरला नव्हता आणि गतवर्षी पावसाळ्यापासूनच टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला होता. मात्र यंदाच्या भरपूर पावसामुळे परिसरातील पाणीस्थितीत मोठा दिलासा मिळाला आहे.

सन १९७२ मध्ये उभारण्यात आलेला हा जलाशय पिंगोरी परिसरातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाचा स्रोत ठरला आहे. जलाशयामुळे बागायती क्षेत्रात वाढ झाली असून हजारो एकर जमीन ओलीताखाली आली आहे. दुष्काळी परिस्थितीत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, स्थानिक रहिवासी बाबा शिंदे, रोटरी क्लब व विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने ग्रामस्थांनी श्रमदानातून जलाशयातील गाळ काढून त्याचे पुनर्जीवन केले होते. त्याचा सकारात्मक परिणाम यंदा स्पष्टपणे दिसून येत आहे.

दरम्यान पावसाने मागील वर्षी लवकर हजेरी लावल्यामुळे जानेवारीपर्यंत परिसरातील ओढे-नाले आणि बंधारे ओसंडून वाहत होते. त्यामुळे भूजल पातळी वाढून विहिरी व कूपनलिकांमधील पाणीसाठा वाढला आहे. परिणामी पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटला आहे.

वाल्हे पंचक्रोशीत जलसंधारणाच्या विविध कामांमुळे तसेच ओढे-नाल्यांचे व बंधाऱ्यांचे खोलीकरण केल्याने पाणीसाठ्यात भर पडली आहे. सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाल्याने यंदा शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होईल, अशी आशा

> “मागील वर्षी मान्सूनपूर्व पाऊस चांगला झाल्यामुळे जून महिन्यातच जय गणेश जलाशय भरून वाहू लागला होता. २३ फेब्रुवारीअखेर जलाशयात ७.४९ दश लक्ष घनफूट म्हणजे सरासरी ४० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे,” — **अविनाश जगताप, शाखाधिकारी, गराडे पाटबंधारे शाखा.**

> "मागील काही वर्षांमध्ये समाजसेवी संस्था, समाजसेवक दानशूर व्यक्ती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्यावतीने पिंगोरी गावामध्ये जलसंधारणाची अनेक कामे करण्यात आली. याचा चांगला परिणाम सध्या पाहायला मिळतो आहे. आज जय गणेश जलसागर मध्ये असलेले पाणीसाठा शेतीला उपयुक्त असून उन्हाळ्यात शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होणार आहे." - **राहुल शिंदे (पोलीस पाटील, पिंगोरी)**

# आपल्या लोकांकडून मिळणारा सन्मान श्रेष्ठ असतो : मा. मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण

**नांदेड/अर्धापूर (दै. संध्या)**

■ राज्य आणि देश पातळीवर विविध जबाबदाऱ्या पार पाडताना अनेक सन्मानाने सत्कार



राज्य आणि देशपातळीवर विविध जबाबदाऱ्या पार पाडताना अनेक सन्मान मिळाले,तरी आपल्या मातीत आपल्या लोकांकडून मिळणारा सन्मान हा कोणत्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ असतो असे प्रतिपादन नरेंद्र–देवेंद्र महोत्सवात पंडीत दीनदयाल उपाध्याय स्मृती प्रतिष्ठान तर्फे ‘नांदेड भूषण’ पुरस्कार मिळाल्यानंतर मा.मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले. निराधारांच्या जीवनात आनंद मिळावा यासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणारे धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांना एक आनंदाची बातमी मी लवकरच देणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. शहरातील नवा मोंढा मैदानात चंद्रभागा केरबा गंजेवार नगरी, कुबेरनगरी,मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत ‘नरेंद्र–देवेंद्र महोत्सवात' टाळ्यांच्या गजरात हा भव्य सन्मान सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित नागरिकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात ते असे म्हणाले की, “माझ्याच गावात, माझ्याच लोकांनी केलेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. नांदेडकरांनी मला मनापासून दिलेली ही पावती आहे.” सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ॲड. दिलीप ठाकूर यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.“देवदर्शनापासून सर्वसामान्यांच्या प्रश्नांपर्यंत त्यांनी सातत्याने काम केल्यामुळे अशा कार्यकर्त्यांमुळेच समाजाला दिशा मिळते,” दिलीप ठाकूर यांच्या पाठीशी मी खंबीर पणे उभा असल्यामुळे येथून पुढे त्यांचे सर्व कार्यक्रम आणखी भव्य होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मनपा तर्फे पूर्वी प्रमाणे दिलीप ठाकूर यांच्या कविसंमेलनासाठी आर्थिक साहाय्य करावे अश्या सुचना त्यांनी महापौरांना दिल्या. मनपा निवडणुकांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की,“सर्व विरोधक एकीकडे असतानाही जनतेने आमच्यावर विश्वास दाखवला. नांदेडकरांनी नेहमीच प्रगतीच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका घेतली आहे.” संत बाबा बलविंदरसिंघजी यांच्या हस्ते स्मृती चिन्ह,मान पत्र,महावस्त्र व रोख रू.11000 देऊन खा.चव्हाण यांना नांदेड भूषण पुरस्कार देण्यात आला.

स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी यांनी व्यासपीठावर उपस्थित माजी मंत्री डी.पी.सावंत,भाजपा शहराध्यक्ष अमर राजुरकर,महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत,कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय लहानकर,किशोर स्वामी, भुजंगराव पाटील डक,डॉ. अंकुश देवसरकर,ॲड.महेश कनकदंडे, प्रवीण साले,सतीश शर्मा,सुरेश लोट, अंबादास लालपोतू,दिलीपसिंग हजारी,सतीश देशमुख,संजय रातोळीकर आदिंचा सत्कार केला.यावेळी हजारो रसिकांची उपस्थिती होती. संयोजक ॲड. दिलीप ठाकूर यांनी प्रास्ताविकात खा.चव्हाण यांच्या कार्याचा आढावा घेतला.“नांदेडचेच नव्हे,तर मराठवाडा आणि महाराष्ट्राचे भूषण म्हणून त्यांची ओळख आहे.त्यांना यापूर्वीच हा पुरस्कार मिळायला हवा होता.मात्र आज तो योग जुळून आला,”असे ते म्हणाले.

खा.चव्हाण यांनी पुरस्कार स्वीकारल्याने ‘नांदेड भूषण’ सन्मानाची उंची अधिक वाढल्याचेही त्यांनी नमूद केले.यापुढे कवी संमेलनासाठी प्रसिद्ध कवी कुमार विश्वास यांना आमंत्रित करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. हा सोहळा अधिक भव्य आणि यशस्वी व्हावा यासाठी राजाश्रयाची गरज असल्याचे सांगत मनपा मार्फत किमान पाच लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली.सूत्रसंचालन संतोष देवराय तर आभार दिनेशसिंह ठाकूर यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शीतल खांडील,राजू मोरे,कामाजी सरोदे,सुरेश शर्मा, राजेशसिंह ठाकूर,संतोष भारती, अरुण काबरा,जगतसिंह ठाकूर, संतोष परळीकर,रोहित ठाकूर, प्रभुदास वाडेकर,महेंद्र शिंदे,विलास जोगदंड,रोहित ठाकूर आदिंनी परिश्रम घेतले.एकंदरीत, ‘नांदेड भूषण’ पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खा.अशोकराव चव्हाण यांच्या कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी अभिषेक अवचार यांची नियुक्ती

**पुणे (दै. संध्या)**



महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेसच्या सचिवपदी अभिषेक वसंतराव अवचार यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. तसेच त्यांच्यावर राज्याचे नियोजन व अंमलबजावणी प्रमुख पदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, त्यांच्या निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी दिले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी व युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रथमेश अबनावे उपस्थित होते. पुण्यात वास्तव्यास असलेले अभिषेक अवचार सध्या युवक काँग्रेसच्या धोरण आणि संशोधन समितीचे राष्ट्रीय संयोजक आहेत. त्यांच्याकडे देशातील लोकसभा आणि विधानसभा क्षेत्राचे विश्लेषण करण्यासह विद्यापीठ स्तरावरील युवकांना काँग्रेसच्या धोरण व योजनांबाबत माहिती देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याअंतर्गत त्यांनी युवक काँग्रेसला राष्ट्रीय स्तरावर 'हात से हात जोडो' हे राष्ट्रीय जनसंवाद अभियान तयार करून देशात यशस्वीपणे राबवले.

## ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणक्रमाचे विधी महाविद्यालयात यशस्वी शिबिर

**नांदेड (दै. संध्या)**




येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक अंतर्गत ग्रंथालय व माहितीशास्त्र या अभ्यासक्रमाचे अनिवासी अभ्यास शिबीर ता.21 व 22 फेब्रुवारी 2026 रोजी संपन्न झाले.या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्रप्रमुख डॉ. विना पाटील यांच्या हस्ते झाले तर शिबीर तज्ज्ञ म्हणून उपप्राचार्य स्वामी विवेकानंद महाविद्यालय उदगीरचे प्रा.डॉ.एस. एल. जाधव आणि प्रा.डॉ.आर. बी. टेकाळे (ग्रंथपाल) श्री.शिवाजी महाविद्यालय परभणी यांची उपस्थिती होती. उद्‌घाटन प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यापीठाची शिबीरा मागील भूमिका स्पष्ट करत शोध निबंध व प्रकल्प विषय ठेवण्या मागच्या उद्दिष्टांचा मागोवा घेतला. तसेच उपस्थित तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना संशोधन आराखडा व शोध निबंध लिहिण्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन केंद्र संयोजक प्रा.डॉ.राजीव वाघमारे यांनी केले.यावेळी त्यांनी एम.लिब. आय. एस.अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती दिली व सदरील शिबीराच्या माध्यमातुन विद्यार्थी,समंत्रक आणि विषय तज्ज्ञ यांच्या मध्ये संबंधीत विषयातील अद्ययावत माहितीची चर्चा घडून आणणे व विद्यार्थ्यांच्या प्रकल्प संशोधनास मान्यता देणे हा उद्देश असल्याचे सांगितले.यावेळी अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्या डॉ.विना पाटील ह्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांच्या पुस्तकांचे आणि अवांतर साहित्याचे देखील वाचन करावे तसेच आपणास दिलेला संशोधन प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करा असे त्यांनी आव्हान केले.यावेळी डॉ.व्ही.एस.खाकरे,प्रा.डॉ.चरणजित सिंघ महाजन,श्री.पी.जी.शिंदे, कार्यालयीन अधिक्षक,प्रा. डॉ.बंडेवार पी.व्ही.श्री.शिंदे एम.बी. तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी आदी उपस्थित होते.सायंकाळच्या सत्रामध्ये समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला.या दोन दिवसीय शिबीरात विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध व प्रकल्प आराखडा सादर केले.

विद्यार्थ्यांच्या वतीने गोविंद फाजगे,बारसे वैष्णवी,कदम उमाजी आदी प्रशिक्षणार्थीनी मनोगत व्यक्त केले.केंद्र संयोजक प्रा.डॉ. आर.के.वाघमारे यांनी अभार मानले. यावेळी शिबीरार्थी विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य करून हा दोन दिवसीय कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला.

# जवाहर बालभवन हे बालकांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र

## शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे : बालभवनचा ७४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**पुणे (दै. संध्या)**




महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन हे केवळ शैक्षणिक किंवा सांस्कृतिक केंद्र नसून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारे प्रेरणादायी व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री तथा बालभवनच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष दादा भुसे यांनी आज केले. महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनचा ७४ वा वर्धापन दिन आज मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात पार पडला. त्यानिमित्त ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देवल, विभागीय शिक्षण उपसंचालक श्री कंकाळ, बालभवनचे अशासकीय सदस्य प्रशांत भामरे, बालभवनच्या संचालिका श्रीनाती निता पाटील आदी उपस्थित होते.

देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २४ फेब्रुवारी १९५२ रोजी बालभवनाच्या इमारतीचे उदघाटन केले होते. या बालभवनाला आता ७४ वर्षे पूर्ण होत आहेत. जवाहर बालभवनमध्ये चित्रकला, संगीत, नृत्य, नाटक, विज्ञान, योग तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व कौशल्यांना चालना दिली जाते. येथे केवळ कला शिक्षणापुरते मर्यादित न राहता जीवनमूल्ये, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुणांचीही जोपासना केली जाते, असे प्रशंसोद्गार मंत्री श्री भुसे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बालभवनाच्या वर्धापन दिनानिमित्त वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, यामधून बालमित्रांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जात असल्याचे मंत्री त्यांनी नमूद केले. बालभवन इमारतीचे नूतनीकरण प्रगतीपथावर असून, लवकरच अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी इमारत बालमित्रांसाठी उपलब्ध होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध राज्यांमधील नृत्यकलांचे मंत्री श्री भुसे यांनी यावेळी कौतुक केले.

विद्यार्थी आणि पालकांच्या योगदानातून बालभवनचे कार्य अधिकाधिक उत्तम होत आहे. बालभवनची नवीन वास्तू आता आकार घेत आहे. ही नवी वास्तू नवतंत्रज्ञानाने सुसज्ज अशी राहणार असून तीत वातानुकुलीत ई-लॅब, भव्य प्रेक्षागृह आदी सर्वच सुविधा राहणार असल्याचे बालभवनच्या संचालिका निता पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले. वर्धापन दिनानिमित्त निबंध लेखन, काव्यलेखन, चित्रकला, रंगभरण, गायन व नृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात सन्मानित करण्यात आले.